मंगळवार, ५ डिसेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ११५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 5 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-115 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# चेन्नईला मिचाँगचा तडाखा

आधुनिक केसरी न्यूज

**चेन्नई : बंगालच्या उपसागरावर तयार झालेल्या मिचाँग चक्रीवादळाचा सोमवारी चेन्नईला प्रचंड फटका बसला. चेन्नईसह इतर जिल्ह्यातही मुसळधार पाऊस सुरू झाला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. रविवारी रात्रीपासून तमिळनाडूच्या किनाऱ्यावर वेगवान वारे वाहू लागले होते. काही भागांत रात्रीच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. या वादळाच्या वाऱ्यांचा वेग ताशी ९० किलोमीटर इतका आहे. या चक्रीवादळामुळे दक्षिण आणि पूर्व भारतातील अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. चक्रीवादळाने तमिळनाडूत हाहाकार माजवला आहे. अनेक ठिकाणचे रस्ते आणि घरे पाण्याखाली बुडाली आहेत. चक्रीवादळापूर्वीच तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे.**

मुसळधार पाऊस आणि वेगवान वाऱ्यामुळे किनाऱ्यालगतच्या भागांमध्ये अनेक झाडे उन्मळून पडली आहेत, रस्ते बंद आहेत. शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. तसेच लोकांनी घरून काम करावे अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणाहून दरडी कोसळल्याच्या बातम्या येत आहेत. चेन्नई विमानतळ बंद करण्यात आले आहे. आतापर्यंत ६ नागरिकांचा बळी घेतला आहे. तमिळनाडूचे महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री के. एस. एस. आर. रामचंद्रन यांनी चक्रवादळामुळे राज्यात आतापर्यंत सहा मृत्यू झाल्याच्या बातमीला दुजोरा दिला आहे. रामचंद्रन महणाले, बस अपघातात हे सहा बळी गेले आहेत. झाड पडून, पूर किंवा वीज पडून कुठेही जीवितहानी झालेली नाही. चेन्नईच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस चालू असून सोमवारी सकाळी ईस्ट कोस्टल रोडवरील एक भिंत कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला आहे, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी सांगितले की, मृत्य झालेले दोघे झारखंडचे होते.



# भाजपा आ. बालमुकुंद आचार्य ॲक्शन मोडवर

## मांसाहारी दुकानांवरून थेट अधिकाऱ्याला फोन करून तंबी

आधुनिक केसरी न्यूज



**हवामहल :** राजस्थानमध्ये भाजपाने काँग्रेसचा धुव्वा उडवला आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठे यश मिळाले आहे. मतदानाचा निकाल समोर येऊन २४ तासेही झाले नाहीत, अशातच भाजपा आमदार ॲक्शन मोडवर आले आहेत. भाजपा आमदाराने रस्त्यावरही मांसाहारी पदार्थ विकणाऱ्या दुकानांवरून थेट अधिकाऱ्याला फोन करून तंबी दिली आहे. बालमुकुंद आचार्य असे भाजपा आमदाराचे नावे आहे. बालमुकुंद आचार्य हवामहल मतदारसंघातून निवडून आले आहेत. आचार्य यांनी सरकारी अधिकाऱ्याला फोन करून रस्त्यावर कुणीही मांसाहार पदार्थ विकू नये, असा इशारा दिला आहे. बालमुकुंद आचार्य फोन करून अधिकाऱ्याला म्हणाले, रोडवरती मांसाहार विकू शकतो का? होय किंवा नाही बोला. तातडीने रस्त्यावरील मांसाहारी पदार्थ विकणारी सगळी दुकाने हटवून टाका. सायंकाळपर्यंत एकही दुकान दिसले नाही पाहिजे. याची माहिती मी तुमच्याकडून घेणार आहे. मग, कोण अधिकारी आहे, याच्याशी मला देणेघेणे नाही. जयपूरच्या हवामहल मतदारसंघातून बालमुकुंद आचार्य यांनी ६०० मतांनी निवडणूक जिंकली आहे. आचार्य यांनी काँग्रेसच्या आर. आर. तिवारी यांचा पराभव केला आहे. तसेच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बालमुकुंद आचार्य यांचा प्रचार केला होता. बालमुकुंद आचार्य यांनीच एकनाथ शिंदेंचा बॅनरवर 'हिंदू हृदयसम्राट' उल्लेख केला होता.



# गारपीटग्रस्त नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

## अशोक चव्हाण यांचे आदेश : शेतीची केली पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** निसर्गाच्या लहरी पणामुळे खरीप व रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाची नूकसान भरपाई अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नाही. शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. संबधीत अधिका-यानी तालूक्यातील गारपीट झालेल्या शेतीचे तात्काळ पंचनामे करून वरिष्ठांकडे अहवाल सादर करावा अशा सूचना माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सोमवारी ता. (चार) दिले आहेत.

तालूक्यातील गारपीट झालेल्या भोसी, चित्तगीरी भागातील शेतीची पाहणी केली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी गोविंद शिंदे नागेलीकर, बाळासाहेब देशमुख बारडकर, जगदीश पाटील भोसीकर, प्रकाश देशमुख भोसीकर, भगवान दंडवे, विनोद चिंचाळकर,उपविभागीय महसूल अधिकारी सचिन यादव, तहसीलदार राजेश लांडगे, जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी भाऊसाहेब भराटे, गटविकास अधिकारी माधव केंद्रे, तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव, आदिनाथ चिंताकुठे,मिर्झा ताहेर बेग,हमीद खॉ पठाण,विकास क्षीरसागर,जवाद बरबडेखर, डॉ.फारुख इनामदार यांची उपस्थिती होती. श्री.चव्हाण म्हणाले की, मागील अनेक दिवसांपासून निसर्गाच्या लहरी पणामुळे सर्वत्र अवकाळी पाऊस, गारपिटीने हातातोंडाशी आलेला खरीप व रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.शासन केवळ गोड आश्वासनं देऊन शेतक-याची थट्टा करीत आहे. अतिवृष्टीने नूकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप आर्थिक मदत मिळाली नाही.शेतक-याना वा-यावर सोडून सत्ता टीकवण्यातच मश्गूल आहेत. मागील आठवड्यात पून्हा निसर्ग कोपल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने केवळ तीन हेक्टर क्षेत्रालावरील नूकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतल्याने अधिकारी कमी अधिक बाधीत क्षेत्र ग्राह्य धरत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. अधिकाऱ्यांनी नूकसानग्रस्त पिकाची पाहणी करून तात्काळ अहवाल वरिष्ठांना सादर करून आधार द्यावा अशा सुचना यावेळी श्री.चव्हाण यांनी केली आहे.









परमेश्वर घुंगासे
संपर्क क्र. 9623115496




आधुनिक केसरी

राज्याच्या आणी केंद्राच्या सत्तेमध्ये वाटाघाटी करण्यासाठी अनेक पैलूंचा विचार केला जातो मुख्यत्वे एखाद्या प्रतिनिधींच्या मागे उभी असलेली स्थानिक जनता त्यातही विशेष करून "जात" हा फॅक्टर प्रामुख्याने मैलाचा दगड ठरतो. परंतु कित्येक वर्षांपासून राज्याच्या आणी देशाच्या विविध भागातून इत्यंभूत रोजगारासाठी सततचे स्थलांतर करण्याऱ्या कामगार वर्गाची प्रतिनिधी म्हणून प्रामाणिकपणे कोणीच जबादारी घ्यायला तयार होत नाही ही शोकांतीका आहे ! राज्यांतर्गत स्थलांतरीत होणाऱ्या कामगार वर्गात जाणतेपणाने दुर्लक्षित झालेला महाराष्ट्रातील एक समाज म्हणजे "कहार-भोई" समाज ! पारंपरिक मासेमारी करणे का मुख्य व्यवसाय असेलेला हा समाज आज राज्याच्या कानाकोपऱ्यात नदी, तलाव, धरणे यांच्या बाजूला आपले छोटेसे पालं/झोपडी बनवून अस्थिर अश्या रोजगाराच्या शोधात असतो.शेती पीकवण्यासाठी जमीन नसल्याने, कायमच्या पडणाऱ्या दुष्काळामुळे सतत या ठिकाणावरून पुढच्या ठिकाणी कुटुंबासोबत वास्तव्य करावे लागते, यात प्रामुख्याने हेळसांड होते ती शाळकरी लहान मुलांची, स्थिर शिक्षणाचा पर्याय उपलब्ध नसल्याने या समाजातील कित्येक मुले शाळाभाह्य वातावरणात वावरू लागतात आणी परंपरेने चालत असलेली संघर्षगाथा त्यांच्या रूपात पुढेही अशीच कायम राहते ! राज्याच्या विविध भागातून प्रत्येक वर्षी हजारो कहार-भोई समाजाचा समाजवर्ग रोजगारासाठी उपयुक्त असणाऱ्या ठिकाणी स्थलांतरीत होऊन, तिथेच मासेमारी करून रोजगाराची तात्पुरती साधने शोधून उपजीविका भागवतो मात्र या सर्वांनमध्ये शासन स्तरावरून अपेक्षेप्रमाणे न मिळणाऱ्या सहकार्यामुळे या वर्गाला आजूबाजूच्या राजकीय, धनिक, आणी अन्यायी प्रवृत्ती असणाऱ्या कंटकाडून अनेकवेळा त्रासही सहन करावा लागतो, विविध शासकीय योजनापासून अथवा शासनाने जारी केलेला घोषणेच्या अंबलबजावणी पासून वंचित ठेवले जाते असे या समाज वर्गाचे प्रत्यक्ष अनुभव आहेत.



## आनंदी पहाट

## वैयक्तिक विकास व्यक्तीसापेक्ष

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

वैयक्तिक विकास हा विद्वान, मार्गदर्शक, सहकारी किंवा अगदी कौटुंबिक सदस्यांद्वारे वापरला जाणारा विषय आहे, परंतु दैनंदिन आयुष्यामध्ये याचा नेमका अर्थ काय आहे, हे प्रत्येकाने समजून घेतला पाहिजे. वैयक्तिक विकास हा एक वाक्यांश आहे; जो प्रतिभा, क्षमता, रोजगारक्षमता आणि संपत्ती सुधारण्यासाठी स्थापित केलेल्या क्रियाकलापांचा संदर्भ देतो. कोणत्याही वेळी आपण जाणीवपूर्वक स्वतःला सुधारण्यासाठी प्रयत्न करत असतो, आपण त्यासाठी वैयक्तिक विकासात सहभागी होतो. वैयक्तिक वाढीचे महत्त्व अधोरेखित केले जाऊ शकत नाही, कारण ते व्यक्तींना स्वतः ची सर्वोत्तम आवृत्ती बनू देते, त्यांना कोणत्याही परिस्थितीत सकारात्मक करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि आत्मविश्वास देते. प्रौढ लोक जीवनाचा अनुभव कसा घेतात; हे प्रामुख्याने रोजगार, वास्तविक जीवनातील अनुभव आणि परस्परसंवाद, अतिपरिचित क्षेत्र आणि इतर अनेक घटकांवर अवलंबून असते. वैयक्तिक विकास प्रौढत्वाच्या विशिष्ट कालखंडाचा संदर्भ देत नाही; त्याऐवजी, जीवनाने देऊ केलेल्या नैसर्गिक ओहोटी आणि प्रवाहांना अनुसरून राहण्यासाठी आयुष्यभर समर्पण आणि जागरूकता आवश्यक आहे, ह्याची जाणीव होत राहते. वैयक्तिक विकास केवळ आपल्या जीवनातील वैयक्तिक पैलू सुधारण्यासाठी संदर्भित नाही. हे व्यावसायिक विकासास देखील लागू होते आणि एक अधिक परिपूर्ण, उत्पादक कर्मचारी बनण्यासाठी आपण आपले करिअर आणि आपले ज्ञान पुढे नेण्यासाठी अनेक सकारात्मक पावले उचलू शकतो. व्यवसायाचा मोठा टप्पा गाठणे, प्रमोशन मिळवणे किंवा आपली कौशल्ये अधिक सक्षम करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक असते. वैयक्तिक विकास आपल्याला आपली पूर्ण क्षमता स्वीकारण्यात आणि आपल्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यात मदत करू शकते. आपल्याकडे कोणत्याही परिस्थितीत भरभराट होण्याची कौशल्ये असतील तर वैयक्तिक विकासाच्या परिणामी, आपल्या जीवनातील सर्वात मोठी स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण होऊ शकतात.



## अंतरी कल्लोळ | शांत झाला ||

विठुचा गजर | सांगतो हा टाळ ||
सदासर्वकाळ | आत्मानंद ||१||
संतांच्या संगती | करीन मी वारी ||
तारील श्रीहरी | चिंता सारी ||२||
पाहिला सोहळा | चंद्रभागे तीरि ||
भक्तांचा कैवारी | विटेवर ||३||
टाळ-चिपळ्यांचा | अनाहत नाद ||
चैतन्याची साद | घाली वारा ||४||
मना नाम गोडी | लागली कृपेने ||
संत संगतीने | धन्य झालो ||५||
आता तुझ्या दारी | वाजवीता टाळ ||
अंतरी कल्लोळ | शांत झाला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

देवां भक्तांस उछेदी । आंगबळें सकळांस खेदी ।
निष्ठुर शब्दें अंतर भेदी । प्राणीमात्रांचें ॥७॥
नीति सांडून मागें । अनीतीनें वर्तों लागे ।
गर्व धरून फुगे । सर्वकाळ ॥८॥
पूर्वजांस सिंतरिलें । पक्षश्राद्धहि नाहीं केलें ।
कुळदैवत ठकिलें । कोणेपरी ॥९॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सत्संगति छूटे नहीं, नित्य नियम सत्संग ।
गुणावाद गुरु की करो, सब प्राणी एक संग ।।४९।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/४९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
गृहस्थांची सत्संगति कधीच सुटत नाही. ते नित्य नेमाने भजन, प्रार्थना, सत्संग करतात आणि कुटूंबातील सर्व सदस्य मिळून एकसाथ सद्गुरूंची महिमा आणि त्यांच्या गुणांचे गुणगान करतात. सद्गुरूंची वंदना, त्यांच्या महिमेचे वर्णन करून, आत्म्याला पवित्र करून आपल्या भक्ती-साधनेस लागले पाहिजे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूप

आधुनिक केसरी

समर्थ म्हणतात की जन्माला आलेल्या प्रत्येकाने हा विचार लक्षात ठेवायला हवा की मला अजून खूप खूप समजायचे आहे. मी अज्ञानी आहे. आणि समर्थांच्या मते, माणसाला या अज्ञानाची जाणीव त्याला आयुष्यात खूप काही शिकवते. कारणं माणसांचा मूळ स्वभाव ज्ञानमय असल्याने त्याला अज्ञान फार वेळ पचनी पडत नाही.आपल्यातील अज्ञान घालवण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो.तो अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी सतत प्रयत्न करत असतो. धडपडतो ,पडतो परत नव्याने उभा रहातो. पण आपल्याला जे मिळवायचे आहे त्यासाठी सतत प्रयत्न करत रहातो. अपयश आले तरी खचत नाही .तो सतत आधार शोधतो,तो आधार धार्मिकतेतून मिळतो आणि जेव्हा त्याला संतसज्जनांचा सहवास लाभतो तेव्हा त्याच्या आयुष्यातील सर्वात जास्त सुंदर काळ असतो. पण लहानपणापासून घरात जर सुसंस्कारित बाळकडू मिळत असेल आणि त्यात संतसज्जनांचा सहवास लाभला तर आयुष्य आनंदमय सुखमय होईल.हे कळते विचारांची दिशा रूंदावते तेव्हा आपल्यातील अज्ञान घालवण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. कधी त्याची दिशा चुकते. समोर जे दिसते तेच खरे असे त्याला वाटायला लागते,पण थोड्याच काळात त्याला अज्ञानाचा साक्षात्कार होतो, आहे आणि मग तो समजतो की ज्ञानाचें केंद्र अदृष्यात आहे सुक्ष्म आहे,या दृष्य विश्वाचे पालनपोषण करणारी जी ब्रम्हस्वरूपी अदृष्य आणि सुक्ष्म सद्वस्तू ती ज्ञानमय आहे.यासाठी त्याचा आटापिटा चाललेला असतो. याठिकाणी जाणीवपूर्वक विचार केला तर अज्ञान पूर्ण पणे नाहीसें होते व खरे समाधान मिळते. संत सज्जनांचा सहवास मिळतो. जीवन जगत असताना सद्सदविवेक जागेवर असणे फार गरजेचे आहे, पण ++++ हा सद्विचार काही बाजारपेठेत मिळत नाही किंवा आजकालच्या युगात जी नवी पिढी ONLINE SHOPPING करते तशी ONLINE PAYMENT करूनही मागवता येत नाही. त्यासाठी त्यासाठी हवा सद्विचार,सदाचार,मनाचा हळवा कोपरा, समाजातील प्रत्येकाचे भले व्हावे हा उद्देश आणि त्यासाठी संतसज्जनांचा सहवास. श्रीराम जय राम जय जय राम




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## गुरु सांगेल तेच साधन

आधुनिक केसरी

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ;



तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा. खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वतःकरता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी. १९६. हृदयी ठेवा राम । मुखी सदा त्याचे नाम । हातात असावे प्रपंचाचे काम । हेच खरे परमार्थाचे मर्म ॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ५ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# आता धुक्यामुळे रब्बीचे पिके येणार धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

सुलतानपूर : खुलताबाद तालुक्यात मागील आठ दिवसांमध्ये अवकाळी पावसाने अहकार केला असून यामध्ये गहू, हरभरा, तूर, मका, कांदा आदी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीतून शेतकरी सावरत नाही तोच मागील दोन दिवसापासून सुलतानपूर सह परिसरामध्ये मागील दोन दिवसापासून पहाटेपासून ते सकाळी दहा वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणात धुके पडत असून सततच्या ढगाळ वातावरणामुळे कांदा, गहू, हरभरा आदी पिकासह भाजीपाला पिकाचेही नुकसान होण्याची भीती वर्तवली जात आहे. नेहमीप्रमाणे निसर्गाशी दोन हात करणाऱ्या शेतकऱ्याला मागील आठवड्यात अवकाळी पावसाने भर टाकली होती. त्यानंतरच्या शेतकरी मात्र पुरता हवालदिल झाल आहे. आठवड्यापासून वातारणात होणाऱ्या बदलामुळे रब्बी हंगामातील पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. पहाटेच्या वेळेस दाट धुके पडत आहे, तर दिवसभर ढगाळ वातावरण राहत असल्याने पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. वातावरणातील बदलाने शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिक अडचणीत पडली आहे.रब्बी पिके वाचविण्यासाठी सध्या परिसरातील शेतकरी पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करण्यात व्यस्त आहे. महागडी औषधे फवारणी करूनही अपेक्षित परिणाम दिसत नसल्याने शेतकरी हवालदिल असून, आर्थिक अडचणीत वाढल्या आहे.



## जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडवा : विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, भूमीहीन शेतकऱ्यांच्या दोन पिढ्या जाऊनही अद्याप तिसऱ्या पिढीलाही स्वतःच्या जमीनीच्या हक्काचा पट्टा, सातबारा मिळाला नाही. त्यामुळे जिवती तालुक्यातील जमिनीची तातडीने संयुक्त मोजणी करावी. जमिनीवर ताबा असलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचे पट्टे देण्यात यावेत. गायरान जमिनीचा ताबा कायम करण्यात यावा, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारकडे केली आहे.
आज नागपूर येथे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची जिवती तालुका भूमीहीन शेतकरी बचाव संघर्ष समितीच्या प्रतिनिधींनी भेट घेतली. यावेळी समितीच्या प्रतिनिधींनी वडेट्टीवार यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी वडेट्टीवार यांनी सर्व प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले. जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देऊ, असा विश्वासही त्यांनी दिला. जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी सरकारकडे केली. 63 वर्षांपासून शेतकऱ्यांचा संघर्ष सुरु आहे. या शेतकऱ्यांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे आहोत. त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक आहे. सरकारने हा प्रश्न मार्गी लावून जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

## संजय राऊत हे तर दलाल : दादा भुसे यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** खासदार संजय राऊत यांनी २०२४ नंतर नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे हे तुरुंगात जातील, असा इशारा दिल्यानंतर प्रत्युत्तरात भुसे यांनी राऊत यांचा दलाल माणूस असा उल्लेख केला. राष्ट्रवादीशी संधान साधून राऊत यांनी शिवसेना संपवण्याची सुपारी घेतली आहे, असा आरोपही भुसे यांनी केला. गिरणा कारखान्याशी संबंधित १७८ कोटी शेअर्स घोटाळ्याचा आरोप केल्यामुळे भुसे यांनी राऊत यांच्याविरुद्ध येथील न्यायालयात बदनामीचा खटला दाखल केला आहे.



## चंद्रपुरात भाजपा कार्यकर्त्यांद्वारा जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदीचे कणखर नेतृत्व, देशभरात विकासाचा झंझावात, 'सबका साथ, सबका विकास व सबका विश्वास' हे धोरण यशस्वीपणे राबविल्या गेल्याने भाजपाला मध्यप्रदेश, राजस्थान व छत्तीसगड या राज्यांमध्ये निर्विवाद बहूमत प्राप्त झाल्याने चंद्रपूर महानगरात भाजपा कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत विजयाचा जल्लोष साजरा केला. नागरीकांना मिठाई वाटून आनंद व्यक्त केला. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रमोद कडू, युवा नेते रघुवीर अहीर, यांच्या नेतृत्वात दि. 03 डिसेंबर रोजी कस्तुरबा चौक येथे साजरा झालेल्या या विजयोत्सवात ब्रिजभुषण पाझारे, राजेंद्र अडपेवार, गिरीष अणे, सुरेश भाकरे, विनोद शेरकी, गणेश गेडाम, राजेंद्र खांडेकर, राहुल घोटेकर, सविता कांबळे, पुष्पाताई उराडे, चंद्रकला सोयाम, रेणुकाताई घोडेस्वार, शेख जुम्मन रिजवी, अरविंद कोलणकर, राजू येले, रवी चहारे, ललित गुलानी, सय्यद चाँद, स्वप्नील मुन, विशाल गिरी, स्वप्निल कांबळे, मोनिषा महातव, चेतन शर्मा, प्रविण चुनारकर, अवलेश यादव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शेकडो भाजप कार्यकर्त्यांनी या विजयोत्सवात सहभाग घेतला. या प्रसंगी भाजप कार्यकर्त्यांनी 'प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जिंदाबाद' चे नारे देवून तीन राज्य केवल झाँकी है, लोकसभा अब बाकी है । असे नारे देवून परिसर दणाणून सोडला.

## आजचा लढा धनशक्ती विरोधात जनशक्तीचा : प्रा. नरेंद्र खेडेकर

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** पूर्वी जनशक्ती विरोधात जनशक्ती अशा प्रकारे जनमत घेतली जात होते परंतु आत्ता धनशक्ती विरोधात जनशक्ती अशा अशा पद्धतीने जनमत होत आहे. हे भारताच दुर्दैव आहे असे मत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटिचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर यांनी लोणार येथील कार्यकर्ता मेळाव्यात व्यक्त केले. लोणार येथील शिवशंभू मंगल कार्यालय येथे लोणार तालुक्याच्या शिवसेना उबाठा कार्यकर्ता व पदाधिकारी आढावा बैठक तथा मेळावा आयोजित करण्यात आला होता.या मेळाव्याला प्रामुख्याने जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत, जिल्हा उपप्रमुख आशिष रहाटे, जिल्हा संघटक प्रा. डॉ. गोपाल बछीरे, महिला जिल्हा संघटिका सौ जिजाताई राठोड ,युवा जिल्हाप्रमुख नंदूभाऊ कराडे, विधानसभा संघटक प्रा. गणेश बचाटे यांनी संबोधित केले. आपल्या भाषणात जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी संघटना व संघटनेचे महत्त्व व




संघटनेची बांधणी या विषया वर बोलताना सांगितले की आज शिवसैनिक तोफेच्या तोंडावर उभे राहून आपले संघटन कौशल्य दाखवत आहे याचा अभिमान आहे जिल्हा संघटक प्रा.डॉ. गोपाल बछिरे यांना जे शिल्लक सेना म्हणून हिणवतात त्यांचा समाचार आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीतून व शेर शायरी च्या माध्यमाने घेतला व बाळासाहेबांच्या विचारा सोबत गद्दारी करणाऱ्यांचा हिशोब जनताच घेईल असे मत व्यक्त केले. तर कुठलाही वनवा पेटण्यासाठी एका आगकाडी ची गरज असते आणि एकदा वनवा पेटला तर त्याच्या ज्वाला दूरपर्यंत जातात आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे चा वनवा पेटलेला आहे असे मत जिल्हाप्रमुख अशीष रहाटे यांनी व्यक्त केले. मेळाव्याला प्रा.नरेंद्र खेडेकर, जालिंदर बुधवत, आशिष रहाटे, प्रा.डॉ. गोपाल बछिरे, प्रा.सदानंद माळी, नंदूभाऊ कराडे, सौ जिजाताई राठोड, प्रा. गणेश बचाटे, दीपक डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती तर ॲड.दीपक मापारी,विजय मोरे सर,गजानन जाधव सर, सौ.सिंधुताई जाधव, संजीवनी वाघ आदी मंचकावर उपस्थित होते. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी तालुकाप्रमुख ॲड दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, श्रीकांत नागरे, परमेश्वर दहातोंडे, कैलाश अंभोरे, सुदन अंभोरे, विजय मोरे, तेजराव घायाळ, विठ्ठलराव नागरे, श्याम राऊत, राजूभाऊ बुधवत, लूकमान कुरेशी इकबाल कुरेशी गोपाल मापारी, तानाजी मापारी, जीवन घायाळ, श्रीकांत मदनकर, अश्रुबा धारकर, सुभाष पुरी,भारत राठोड, समाधान मापारी, तानाजी अंभोरे, राजू दहातोंडे, शरद चाटे, गणेश दहातोंडे, समाधान ठाकरे, समाधान पडघन, गफारभाई शहा, बंडूभाऊ जोगदंड, लालूभाई मुल्लाजी, प्रवीण शिरसाट, संजीवनी वाघ, सिंधुताई जाधव यांनी परिश्रम घेतले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीवनी वाघ व जीवन घायाळ यांनी केले तर आभार गजानन जाधव सर यांनी मानले.

# काँग्रेसला मनमानी भोवली ?

आधुनिक केसरी

देशात चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल समोर आले असून त्यात भाजपाने तीन राज्यांमध्ये काँग्रेसला पराभूत केले आहे. त्यामुळे काँग्रेसची निवडणूक रणनीती व पुढील वर्षीच्या लोकसभा निवडणुकांसाठीची समीकरणं यावर मोठी चर्चा पाहायला मिळत आहे. राजस्थानमध्ये अँटि इन्कम्बन्सीचा घटक महत्त्वाचा ठरल्याचे वरकरणी सांगितले जात असले, तरी या पराभवाची सखोल कारणमीमांसा काँग्रेसमध्ये चालू झाल्याचं दिसत आहे. त्यातच खुद्द अशोक गहलोत यांचे ओएसडी लोकेश शर्मा यांनीच एक्सवर (ट्विटर) केलेल्या सविस्तर पोस्टमधून गहलोत यांच्या कामगिरीवर तोफ डागली आहे. राजस्थानमध्ये भाजपाला ११५ जागांवर विजय मिळाला असून काँग्रेसला अवघ्या ६९ जागा जिंकता आल्या आहेत. त्यामुळे राज्यात काँग्रेसचे झालेले पानिपत चर्चेचा विषय ठरले आहे. राजस्थान विधानसभेचे अध्यक्ष सी. पी. जोशी यांनी मतांचा टक्का वाढवण्यात अपयश आल्याचे कारण सांगितले असताना लोकेश शर्मा यांनी मात्र या सगळ्या पराभवाला एकट्या अशोक गहलोत यांना जबाबदार धरलं आहे. रविवारी संध्याकाळी यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर सविस्तर पोस्ट केली आहे. तसेच, त्यात २५ सप्टेंबरच्या एका घडामोडीचा उल्लेख करत या सगळ्याला तेव्हापासूनच सुरुवात झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. लोकशाहीत जनताच मायबाप आहे आणि जनादेश शिरसावंद्य आहे. तो विनम्रतेने आम्ही स्वीकारत आहोत. मला या निकालांमुळे वाईट तर नक्कीच वाटले आहे, पण आश्चर्य वाटलेले नाही. काँग्रेस पक्ष राजस्थानमध्ये नक्कीच परंपरा बदलू शकत होता. पण अशोक गहलोत यांना कधीच कुठला बदल नको होता. त्यामुळे हा काँग्रेस पक्षाचा नाही, तर अशोक गहलोत यांचा पराभव आहे. गहलोत यांच्या चेहऱ्यावर, त्यांना मुक्तहस्त देऊन, त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षानं निवडणुका लढल्या. गहलोत यांना असं वाटत होतं की प्रत्येक जागेवर ते स्वतःच निवडणूक लढवत आहेत. पण या निवडणुकीत ना त्यांचा अनुभव कामी आला, ना जादू, असे लोकेश शर्मा यांनी पोस्टमध्ये नमूद केले आहे. सलग तिसऱ्यांदा गहलोत यांनी मुख्यमंत्री असून पक्षाला काठावर आणून सोडले आहे. आजपर्यंत त्यांनी पक्षाकडून फक्त घेतले आहे. पण ते सत्तेत असताना कधीच पक्षाला पुन्हा सत्ता मिळवून देऊ शकलेले नाहीत. पक्षातील हायकमांडला फसवून, त्यांच्यापर्यंत खरी माहिती पोहोचू न देता, दुसरा कुठलाही पर्याय उभा राहू न देणे, स्वार्थी लोकांमध्येच राहून सातत्याने चुकीचे आणि गडबडीत निर्णय घेणे, सर्व प्रकारच्या अंदाजांकडे दुर्लक्ष करून मनमानी पद्धतीने आणि आपल्या आवडत्या उमेदवारांनाच त्यांचा पराभव स्पष्ट दिसत असूनही तिकीट देण्याचा हट्ट करणे अशा गोष्टी पराभवासाठी कारणीभूत ठरल्या, असेही शर्मा यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

# भारतीय नौदलाचे जनक : शिवाजी महाराज!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**संकुश पाणबुडी हे सुद्धा नौदलाचे भाग आहेत. इ.स.१९५३मध्ये हवेत मारा करणारी शस्त्रे आणि इ.स.१९६७मध्ये पाणबुड्या ताफ्यात समाविष्ट झाल्या. युद्धनौका बांधणीचा प्रकल्प देशातच हवा या अनुषंगाने गोदीमध्ये इ.स.१९६६ वर्षी लढाऊ जहाजाच्या बांधणीचे काम सुरू झाले. या माध्यमातून आजतगायत ८० युद्धनौकांची बांधणी करण्यात आली आहे. त्यात टेहळणी जहाजांपासून विनाशिकेपर्यंत आणि लढाऊ जहाजे, पाणबुडी यांच्यासह युद्धनौकांचाही समावेश आहे.**

अन्य राष्ट्रांच्या विनंतीवरून भारतीय नौदल त्या त्या राष्ट्रांच्या समुद्रसीमेतही तैनात होऊ लागले. इतर राष्ट्रांच्या बंदरांना भेटी, संयुक्त कवायत, प्रशिक्षण व आपत्कालीन मदत याद्वारे मैत्रीचे संबंध बळकट करण्यात आले आहेत. अमेरिकेची संयुक्त संस्थाने, फ्रान्स, रशिया, चीन आदी राष्ट्रांबरोबर नौदलाने संयुक्त कवायतींमार्फत ज्ञानाचे आदानप्रदानही केले आहे. इ.स.२००४मध्ये त्सुनामी संकटात श्रीलंका, इंडोनेशिया आणि मालदीव या देशांना तात्काळ मदतीचा हात दिला. ४ डिसेंबर इंडियन नेव्ही डे म्हणजे भारतीय नौदल दिन म्हणून ओळखला जातो. सन १९७१साली भारताच्या नौदलाद्वारे पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात कराची बंदरावर हल्ला करण्यात आला, विशाखापट्टणमवरचा हल्ला परतवण्यात आणि पूर्व पाकिस्तानातल्या नेव्हीचे उच्चाटन करण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली होती. या कामगिरीचे नाव होते ऑपरेशन ट्रायडण्ट. ४ डिसेंबरला ही कामगिरी यशस्वी झाली. या कामगिरीला सलाम म्हणून भारतीय नौसेना नेव्ही डे साजरा करते. एमईआरएस, एनएमईआर आरटी फिसर ॲप्रॅण्टिसेसस- एए आणि डायरेक्टर एण्ट्री डिप्लोमा होल्डर्स- डीइडीएच या पदासाठी दरवर्षी फेब्रुवारी आणि ऑगस्टमधील रोजगार समाचार आणि सर्व आघाडीच्या राष्ट्र/ प्रादेशिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात दिली जाते. नौदल भरती संघटना नौदलाच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयामध्ये असणाऱ्या मनुष्यबळ नियोजन आणि भरती संचालनालयाअंतर्गत नौदल भरती संघटना काम करते. नौदलामध्ये कर्मचाऱ्यांची भरती करण्याची जबाबदारी या संघटनेवर असते. भारतीय नौदलात खलाशांची भरती वर्षातून दोन वेळा होते.

भारतीय नौदलाच्या या अफाट कामगिरीमुळे पाकिस्तानच्या नौदलाचे तसेच हवाई दलाचे कंबरडे मोडले. त्यांची एक बाजू कमकुवत होऊन त्याचा परिणाम युद्धाच्या रणनीतीवर झाला. भारतीय नौदलाच्या हल्ल्याने युद्धाचे चित्रच पालटले आणि पुढच्या केवळ १३ दिवसात भारताने पाकिस्तानविरुध्दचे सन १९७१चे युध्द जिंकले. परिणामी पाकिस्तानचे दोन तुकडे पडले आणि बांग्लादेश स्वतंत्र झाला. भारतीय नौदलाची सुरुवात ईस्ट इंडियाच्या काळात झाल्याचे मानण्यात येते. ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी नौदलाची एक टीम तयार केली. नंतर याचे नामकरण रॉयल इंडियन नेव्ही असे करण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर सन १९५०साली रॉयल इंडियन नेव्ही हे नाव बदलण्यात आले आणि भारतीय नौदल अर्थाच इंडियन नेव्ही असे ठेवण्यात आले. भारतीय नौदल दिवसानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याची तयारी विशाखापट्टनमच्या इंडियन नेव्हीच्या बेसवर करण्यात येते. सुरुवातीला युध्द स्मारकाला पुष्प अर्पण केले जाते आणि नंतर नौदलाच्या पाणबुडी, जहाजे आणि विमानांच्या ताकतीचे आणि कसरतींचे प्रदर्शन करण्यात येते.



लढाऊ विमानांच्या तुकड्या आहेत. २०० मरीन कमांडों नौदलात आहेत. तसेच भारतीय नौदलाच्या आयएनएस. विराट, डेली क्लास, त्रिशूळ, आयएनएस बेटवा आणि मिसाईलचा मारा करणारी नौका विनाश या नौका तसेच संकुश पाणबुडी हे सुद्धा नौदलाचे भाग आहेत. भारतात नौदलाचे किती प्रकार आहेत? भारतीय नौदलाची सर्वात मोठी जहाजे त्याच्या दोन फ्लीट्सचा भाग आहेत. फ्लीट म्हणजे जहाजांचा एक समूह जो एका अधिकाराखाली काम करतो. भारतीय नौदलाचा वेस्टर्न फ्लीट मुंबई येथे आहे आणि ईस्टर्न फ्लीट विशाखापट्टणम येथे आहे. भारतीय नौदलाचं नवे बोधचिन्ह छत्रपती शिवाजी महाराजांपासून प्रेरित होऊन तयार झाले आहे. भारताची सर्वांत मोठी, स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आईएनएस. विक्रांत भारतीय नौदलात दाखल झाली. यावेळी भारतीय नौदलाच्या नवीन चिन्हाचेही अनावरण करण्यात आले, ज्यात पूर्वीच्या दोन लाल रेषा आता काढून टाकण्यात आल्या आहेत. त्यांना सेंट जॉर्जेस क्रॉस म्हणत असत. या दोन रेषा कायमच भारतीय नौदलाच्या चिन्हावर राहिल्या आहेत, ज्या ब्रिटिश राजवटीपासून तशाच राहिल्याचं सांगितलं जातं. आता मात्र भारतीय नौदलाच्या नवीन झेंड्यावर एकीकडे वर भारताचा तिरंगा दिसणार आहे, तर त्याच्या बाजूला नौदलाचे बोधचिन्ह अगदी ठळकपणे दिसणार आहे.

भारतीय नौदल १७व्या शतकातील मराठा सम्राट, छत्रपती शिवाजी महाराज भोसले यांना भारतीय नौदलाचे जनक मानले जाते. इ.स.१९३४मध्ये ब्रिटीशांनी स्थापलेल्या रॉयल इंडियन नेव्ही- आरआयएन या सेनेपासून सुरुवात झाली. इ.स.१९७१च्या भारत व पाकिस्तान युद्धामध्ये नौदलाने चढविलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे विजयश्री मिळविणे अधिक सुकर झाले. हा क्षेपणास्त्र हल्ला चढविण्यात आला तोच दिवस ४ डिसेंबर नौदल दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतीय महासागर क्षेत्रात संतुलन आणि सुरक्षा राखण्याचे काम नौदलाकडून होते. भारतीय नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. नौदलाकडे १५५ युद्धनौकांच्या तोफा आहे. नौदलाच्या हवाई शाखेत ध्रुव, चेतक, सी किंग इत्यादी शस्त्रसज्ज हेलिकॉप्टर्स व सी हॅरियर्स या

वसाहतवादाच्या प्रभावापासून दूर जाण्याच्या भूमिकेमुळे नौदलाचे नवीन बोधचिन्ह तयार करण्याचा विचार समोर आला. या चिन्हाला इतिहासाचा संदर्भ असावा, असा विचारही केला गेला. त्यानुसार नवीन चिन्हासाठी संपूर्ण नौदलाकडून वेगवेगळ्या कल्पना मागवण्यात आल्या होत्या. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरामारापासून प्रेरित होऊन हे नवे बोधचिन्ह तयार करण्यात आल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अनावरण करताना सांगितले आहे. या बोधचिन्हाचे अनावरण कोच्चीमध्ये झाले, तेव्हा त्याच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांची ओळखही यावेळी करुन देण्यात आली. या चिन्हाच्या वरच्या बाजूला भारताची राजमुद्रा आहे, तर त्याखाली जहाजाचे एक नांगर दाखवण्यात आले आहे. हे सगळं एका अष्टकोनी ढालीवर कोरण्यात आलं आहे, ज्याच्या खाली देवनागरीमध्ये भारतीय नौदलाचे ब्रीदवाक्य "शं नो वरुणाः" लिहिण्यात आले आहे. ज्याचा अर्थ "वरुण देवता म्हणजेच पावसाची देवता आमचे रक्षण करो!" मात्र या ढालीचा आकार अष्टकोनी असण्यामागचं कारण विशेष आहे. या अष्टकोनाच्या आठ बाजू भारतीय नौदलाच्या सर्व दिशेत पोहोचण्याची आणि कारवाई करण्याची क्षमता दाखवतात, असे यावेळी सांगण्यात आले.

तसेच हा आकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेवरून घेण्यात आल्याचंही यावेळी सांगण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय नौदलाचे जनक आहेत, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदीजी म्हणाले. स्वतःच्या साम्राज्याला परकीय शक्तींच्या समुद्रावाटे होणाऱ्या संभाव्य हल्ल्यापासून वाचवायला त्यांनी सर्वांत पहिली योजना आखून स्वतःचे नौदल कसे उभारले होते, हेही यावेळी पंतप्रधानांनी सांगितले. त्यामुळे शिवाजी महाराजांनासुद्धा या कार्यक्रमात मानवंदना अर्पण करत भारतीय नौदलाने त्यांच्या नवीन चिन्हाचे अनावरण केले. आईएनएस. विक्रांत ही भारताची आजवरची सर्वांत मोठी स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आहे. भारताच्या आसपासच्या समुद्रात होत असलेल्या कारवाया लक्षात घेता या युद्धनौकेचं भारतीय नौदलात दाखल होणं खूप महत्त्वाचं मानलं जात होतं. राष्ट्रपतींनी या चिन्हाला मान्यता दिली आहे. नौदलाचं चिन्ह स्वातंत्र्यानंतर चौथ्यांदा बदललं आहे, हे विशेष!

# भारतात अराजकता पसरवण्यासाठी ड्रोनचा वापर



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारतामध्ये अराजकता पसरवण्याच्या पाकिस्तानच्या नापाक योजना सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) पुन्हा एकदा उघडकीस आणल्या आहेत. यावेळी प्रकरण ड्रोनशी संबंधित आहे. एका वर्षात आपल्या सीमेवर 90 ड्रोन पकडले किंवा नष्ट केले गेले. त्यांच्यासोबत आलेले अमली पदार्थ आणि शस्त्रेही जप्त करण्यात आली. सुरक्षा दलांनी आतापर्यंत पाडलेल्या ड्रोनमधून रायफल, पिस्तूल, एमपी4, कार्बाइन, कार्बाइन मॅगझिन, ग्रेनेड तसेच अंमली पदार्थ जप्त केले आहेत. पाकिस्तानचे 81 ड्रोन पंजाबच्या सीमेवर तर 9 ड्रोन राजस्थानच्या सीमेवर आढळून आले आहेत. ड्रोनद्वारे भारतीय सीमेवर ड्रग्ज आणि शस्त्रे पाठवण्यामागे पाकिस्तानचा हेतू स्पष्ट आहे.**

साहजिकच पाकिस्तानला भारतात अराजकता पसरवायची आहे. त्याचबरोबर लोकांना, विशेषतः तरुणांना ड्रग्जच्या दलदलीत अडकवून त्यांना भारताविरुद्ध वापरायचे आहे. पंजाबमध्ये अंमली पदार्थांच्या व्यसनामुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होण्याच्या समस्येमागे पाकिस्तानचा हात आहे, हे लपून राहिलेले नाही. पाकिस्तानचे कोणतेही पाऊल अनपेक्षित मानले जाऊ शकत नाही. भारतात अस्थिरता आणि हिंसेची बीजे पेरण्यासाठी तो नेहमीच तयार असतो. त्यासाठी तो नवनवीन मार्ग शोधत असतो. कधी अतिरेकी हल्ल्यातून, तर कधी शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांच्या तस्करीच्या रूपाने त्याच्या कारवाया सुरू असतात. या कारवाया उघडकीस येत आहेत. कधी तो भारतातील नागरिकांना फसवून भारताविरुद्ध वापरताना दिसतो, तर कधी आपल्या दहशतवाद्यांना भारतात घुसखोरी करायला लावतो. या दहशतवाद्यांना मदत करण्यासाठी आपले सैनिकसुद्धा पुढे पाठवायला तो मागेपुढे पाहत नाही. या दहशतवादी कारवाया त्यालाही अडचणीत आणत आहेत, हे खरे असले तरी त्यातून तो काहीच बोध घ्यायला तयार नाही. भारताला कसे नामोहरम करायचे, हेच तो पाहत असतो. त्याची आर्थिक स्थिती इतकी बिकट झाली आहे की तेथील नागरिक अन्नालाही महाग झाले आहेत. आता तो स्वतः दहशतवादी हल्ल्यांचा सामना करत आहे. आपण स्वतः उद्वस्त होत असतानाही तो आपल्या नापाक कृत्यापासून परावृत्त होताना दिसत नाही. चीनने तर त्याला कह्यातच घेतले आहे. भारताने प्रत्येक वेळी पाकिस्तानचा पराभव केला आहे. असे असूनही दक्षतेची व सतर्कतेची गरज आहे. तो खलिस्तानी फुटीरतावाद्यांना उघड पाठिंबा देत आहे. काश्मीरमध्ये हिंसाचार पसरवण्यासाठी तो नवनवीन क्लृप्त्या वापरत आहे. ड्रोनद्वारे ड्रग्ज आणि शस्त्रे पाठवणे हा देखील त्यातलाच एक प्रयत्न आहे. त्याचे ड्रोन पकडले जात असले तरी काही ड्रोन इच्छितस्थळी पोहचताही असतील. सापडलेल्या ड्रोनसंबंधी चौकशी सुरू आहे. ड्रोनच्या माध्यमातून भारतात येणारी शस्त्रे आणि ड्रग्ज कोणाकडे येत आहेत आणि ते कोणत्या स्वरूपात वापरले जाणार आहेत किंवा होते, याचाही शोध घेतला पाहिजे. तपास यंत्रणांनी देशभर पसरलेल्या या जाळ्याचा पर्दाफाश करायला हवा.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मोदींचा करिष्मा: तीन राज्यात भाजपाचा वरचष्मा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**रिसोड :** चार राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राजस्थान, छत्तीसगड, आणि मध्य प्रदेश या तीन राज्यात भाजपाचा दणदणीत विजय झाला आहे. त्या अनुषंगाने रिसोड येथे मोठया जल्लोषात विजयोत्सव साजरा करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा करिष्मा आजही कायम असल्याने चार पैकी तब्बल तीन राज्यात भाजपाचा वरचष्मा राहिला असल्याचे मत भाजपाचे युवा नेते ऍड. नकुल देशमुख यांनी व्यक्त केले आहे. आपल्या कार्यालयासमोर विजयोत्सव साजरा करत असताना ते कार्यकर्त्यांशी बोलत होते.

मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान या तीन राज्यात घवघवित यश मिळून स्पष्ट बहुमत प्राप्त केल्या बद्दल भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख ॲड. नकुल देशमुख यांच्या कार्यालय बाहेर व रिसोड शहरात भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला.

जगातील लोकप्रिय नेते पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, भारतीय जनता पक्षाचे भारताचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, गृहमंत्री अमित शहा,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मध्यप्रदेशच्या सहभागी राष्ट्रीय महासचिव पंकजाताई मुंडे या सर्व नेत्यांचे नेतृत्वात प्रभावी प्रचार व चाणक्य नीति ने भारतीय जनता पक्षाने घवघवीत यश मिळवले तसेच कार्यकर्ते पदाधिकारी राज्य व राष्ट्रीय नेत्यांच्या मेहनतीमुळे मध्य प्रदेश राजस्थान व छत्तीसगडमध्ये पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. याबद्दल रिसोड येथे रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे निवडणूक प्रमुख ॲड नकुलदादा देशमुख यांच्या जनसंपर्क कार्यालयाबाहेर तसेच रिसोड शहरात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने फटाके फोडून व नरेंद्र मोदी चा विजयाचा जयघोष करून विजय उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून जल्लोष केला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश, जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, भाजप सर्व मोर्चा, सेल, आघाडी, प्रकोष्ट अध्यक्ष, संयोजक, सहसयोंजक, तालुका पदाधिकारी, युवक, जेष्ठ, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्यावरचा विश्वासाचा विजय : ॲड .नकुल देशमुख



जगातील लोकप्रिय नेते भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे देशात मोठ्या प्रमाणात असलेले विकास कार्य, प्रत्येकाच्या घरात मनात त्यांनी विश्वास निर्माण केला, देशाचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात मोठे केले, देशातील शेवटच्या घटकापर्यंत गोरगरीब जनतेसाठी योजना राबवून देशातल्या प्रत्येकाला त्या योजनेचा लाभ मिळेल अशी व्यवस्था निर्माण केली . त्यामुळे देशातील प्रत्येक व्यक्तीस पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्यावर विश्वास आहे आज मध्य प्रदेश राजस्थान व छत्तीसगड या राज्यात मोदीजी यांचे लोकप्रियता व विश्वास यामुळे त्या राज्यातील जनतेने स्पष्ट बहुमत देत भारतीय जनता पार्टीला विजयी केले आहे . येणाऱ्या लोकसभा निवडणुकीतही देशातील जनता नरेंद्रजी मोदी यांना भूतो ना भविष्य स्पष्ट बहुमत देऊन विजयी करणार आहे .



# दीक्षाभूमीच्या विकासाकरिता 56 कोटी 90 लक्ष निधीच्या प्रस्तावाला मंजुरी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पवित्र दीक्षाभूमीचा सर्वसमावेशक विकास करण्याच्या दिशेने आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. यात त्यांना यश येत असून दीक्षाभूमीच्या विकासासाठी उच्च अधिकार समितीच्या वतीने 56 कोटी 90 लक्ष रुपयांचा प्रस्ताव मंजूर केला असुन आता सदर कामाचा प्रस्ताव अंतिम टप्यात आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनी जगात नागपूर आणि चंद्रपूर अशा दोनच ठिकाणी बौद्ध धम्माची दिक्षा दिली. नागपूर येथील दीक्षाभूमीचा विकास झालेला आहे. मात्र चंद्रपूर येथील दीक्षाभूमी अविकसित राहिली आहे. येथे देशभरातुन येणाऱ्या अनुयायांसाठी कसल्याही सोयीसुविधा उपलब्ध नाही. परिणामी येणाऱ्या अनुयायांची गैरसोय होत आहे. त्या अनुषंगाने दीक्षाभूमीच्या विकासासाठी आमदार किशोर जोरगेवार प्रयत्नशील आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनी पहिल्याच हिवाळी अधिवेशनात दीक्षाभूमीच्या विकासासाठी एकत्रित १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी विधानसभेत केली होती. त्यानंतर त्यांनी दीक्षाभूमी समितीचे पदाधिकारी यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घडवून आणली होती. त्यानंतर सत्ता परिवर्तन झाल्यावर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ही सदर मागणीचा पाठपूरावा सुरु ठेवला होता. अखेर त्यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चंद्रपूर येथील दिक्षाभुमीच्या विकासासंदर्भात घोषणा केली होती.

दरम्यान त्या अनुषंगाने चंद्रपूरच्या दिक्षाभुमी विकासासाठी उच्च अधिकार समितीच्या वतीने 56 कोटी 90 लक्ष रुपयांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून सदर प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाकडे अंतिम मान्यतेकरिता पाठविला आहे. सदर प्रस्तावित निधी वित्त विभागाकडून मंजूर करत कामाला प्रशासकिय मान्यता देण्याकरिता प्रयत्न करणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

दीक्षाभूमीच्या विकासकामाचा पाठपूरावा करुन पवित्र दीक्षाभूमीच्या विकासाचे काम पूर्णत्वाकडे नेत असल्या बदल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटीच्या पदाधिका-यांनी आज सोमवारी जनसंपर्क कार्यालयात आमदार किशोर जोरगेवार यांची भेट घेत त्यांचे आभार मानले आहे.

# नागरीकांसाठी पालकमंत्री मुनगंटीवार यांचा 'महाजनसंपर्क' ठरला मोलाचा


आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नागरीकांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण व्हावे व त्यांना वेगवेगळ्या कार्यालयांच्या सातत्याने फेऱ्या मारण्याचे काम पडू नये, यासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेले 'महाजनसंपर्क' अभियान चंद्रपूर करांसाठी मोलाचा ठरला. चंद्रपूर येथील नियोजन भवनात शुक्रवारी श्री. मुनगंटीवार यांनी नागरीकांशी संवाद साधत त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी नागरीक वेगवेगळ्या सरकारी विभागातील कार्यालयांच्या फेऱ्या मारत असतात. परंतु अनेकदा त्यांचे प्रश्न सुटत नाहीत. त्यामुळे त्यांची गैरसोय होते. ही बाब लक्षात घेता मुनगंटीवार यांनी स्वतः पुढाकार घेत 'महाजनसंपर्क' घेतला. या महाजनसंपर्क कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., महापालिका आयुक्त विपीन पालीवाल, राहुल पावडे, देवराव भोंगळे, संध्या गुरनुले, ब्रिजभूषण पाझारे यांच्यासह मोठ्या संख्येने जिल्हाभरातील नागरीक उपस्थित होते. यावेळी मुनगंटीवार म्हणाले की, सर्वांनीच जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. 'महाजनसंपर्क' हा त्यासाठी महत्वाचा दुवा ठरू शकतो. केवळ एकदा 'महाजनसंपर्क' घेऊन थांबणे योग्य होणार नाही. संपूर्ण जिल्ह्यात अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील सर्व सहा विधानसभा मतदार संघात आगामी काळात 'महाजनसंपर्क' घेण्यात यावे, अश्या सूचना पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिल्या. आपण सुरुवातीपासूनच जनतेच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले आहे. पालकमंत्री या नात्याने तर जिल्ह्याचे पालकत्वाची जबाबदारी आपल्याकडे आहे. अशात लोकांना अडीअडचणींचा सामना करीत प्रशासनापर्यंत पोहोचण्याची कसरत करायला लावण्यापेक्षा प्रशासनाला त्यांच्यापर्यंत कसे पोहोचविता येईल, हाच प्रयत्न आपला राहणार आहे. त्यामुळे सर्व विभागातील अधिकाऱ्यांनीही याच दृष्टीने नियोजन करीत पावले टाकावी, असे निर्देश सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेत.



महाराष्ट्र Business Katta









# प्रतिमा, प्रतिकांनी भाषासमृद्ध खंडकाव्य संग्रह... चित्रपल्लव स्वरसमिधा



नारायण खरात पाटील
संपर्क क्र : ९४०४६२६७८४

आधुनिक केसरी

**शब्द सुरांना लयदार रेषेच्या काव्यपंक्तीत बसवून त्यांना मनसोक्त रंगाभिषेक घालून अभिजात भावचिरमुद्रा उमटविणारा कवी साईनाथ फुसे यांचा "चित्रपल्लव स्वरसमिधा"हा खंड काव्यसंग्रह वाचून मी आनंद लहरींनी अतिशय थक्क झालो. समुद्रमंथनातून निघालेल्या तळखोल रत्नराशी पाहून जसे थक्क व्हावे ; तसेच या भाषासमुद्र मंथनातून निघालेल्या शब्दरत्नांचा खजिना पाहून थक्क व्हायला होते. मला तरी ही कविता या शतकातली वाटत नाही.संस्कृत,प्राकृत भाषेच्या प्रभाव काळातील वाटते. एवढे तिचे भाषिक सुवर्ण मौलिक मोल या काव्याने प्राप्त केलेले आहे. या चित्रकाव्य प्रवासामध्ये सौंदर्य यामिनीचे विराट दर्शन नित्य नव्या चित्र पल्लवांनी चिरतनू साक्षात्कार घडवत राहतात. डोळे दीपवतात. आपणच या प्रवासात चालत आहोत. घटना घडत आहेत.सदेह निसर्ग सौंदर्यांनी आपण व्यक्त झालो आहोत. या अथांग स्वर्गीय सुखाच्या वाटेवर दिव्य अनुभूती घेत आहोत असे वाटत राहते. आपल्याला वास्तवाचा विसर पाडायला भाग पाडणारे हे काव्य स्वर्गीय सुखाच्या प्रवासाला घेऊन जाते. समाधीस्थ नायक त्याच्या अंतर्मग्न विश्वात बुडून गेलेला आहे. स्वर्गीय निलशांत सागराच्या लाटावरती स्वतंद्रीत डुंबतो आहे.**

या समाधीस्थ तरंग लाटांनीच या शब्दांना खंडकाव्य किनारी आणून सारस्वताला ही काव्यस्वर काव्यांजली सुपूर्द केली आहे असे वाटते. वाचकांना ही आनंदघन वाचन संधी उपलब्ध झाली आहे. यासाठी साईनाथ फुसे यांना खूप खूप शुभेच्छा.

मुखपृष्ठावरील स्वरमग्न नायक आणि मलपृष्ठावरील पाठमोरी नायिका ही चित्रेच वाचक रसिकाला संमोहित करतात आणि या खंडकाव्य वाचन प्रवासाला प्रोत्साहित करतात. यातील काव्य वाचताना आशयघन काव्यरचनेतील शब्द निर्मितीचे लाघव एवढे कुठून आले असावे याचे नवल वाटत राहते. अर्थ उलगडा न होणाऱ्या कितीतरी शब्दांचे भाषासौंदर्य या अडथळ्यांना पुरून उरते आणि ते शब्द लाघव आपल्याला घट्ट बिलगते. त्यामुळे अनाम शब्दांचे भावतरंग देखील मनावरती सुंदर भावचित्र कांचनलकेर रेखांकित करण्यात सहजगत्या यशस्वी होतात. हीच या खंडकाव्याची ताकद आहे असे मला वाटते.

यामध्ये चित्र, रेषा आणि काव्य यांची रूपे एवढी एकजीव झालेली दिसतात की त्यांच्यात स्वअस्तित्वाच्या स्वतंत्र खुणा राहतच नाहीत. 'देहादेही एक' होऊन जाण्याची ईश्वरी किमया वाटते. मनोदेवालयात नंदादीप तेजाळावा असा वाचकानंद तेजकांचन होतो. आरस्पाणी पटलावर कांचनदेह छाया पडावी तद्वतच या काव्याचे सौंदर्य ठायी ठायी उमटत राहते.

नाद, रस, रुप, गंध, स्पर्शाची मधुर भावगुंफन घेऊन ही कविता प्रकट होते.यातील सारस्वत हा मनस्वी कलंदर कलावंत आहे. चित्र, संगीत, नृत्य, अशा सर्व कलांचा साधक आहे. म्हणूनच त्याच्या लेखणीला या यामिनीच्या गंध परिमळाचा दरवळ आहे. चित्रपल्लव या शब्दातील कोवळीकता हृदयातील स्पंदनांच्या नाजुकतेशी साम्य सांगणारी आहे. स्वरसमिधा अर्पण करण्याची कल्पनाच किती विरक्तपणाची व्यापकता सांगून जाते. या कवी कलावंताचं मन शुभ्रधवलकांत, स्पटिकजल प्रवाही आहे. यामध्ये तो निसर्गातील समस्त रंगांची बेमालुम मिसळन करून त्यावरती रत्नचुर शब्दांच्या पोताने हिमशुभ्र वस्त्रावर एक अमिट कलाकृती काढतो आहे. शब्दश्रीमंती, सूरश्रीमंती आणि रंगश्रीमंती यांच्या त्रिवेणी संगमाचा मिलाप साईनाथ फुसे यांच्या मनोदेही झालेला दिसतो.या कलंदराने अवघ्या वसुंधरेला आपल्या शब्दसुरावटीने मुक्तधुंद थिरकायला लावले आहे. ही किमयागारी या कलावंताच्या शब्दसुररंगाने उभी केली आहे.

**तुझी अंग मार्दव अनुपम अंगकळा फुल सुंदर**
**माझा पानीफुली घनकंप मंद मधुर वेणूस्वर**
**मालाबद्ध मेघमाला तू आठवते आभाळभर**
**सौरम्य स्नेहमंजिरी तू त्वस्मृती सर्वथैव नवथर**
**मंदाकिनी शर्मिष्ठा तू अंगी सुंदर कनकांबर**
**ज्योतिर्मय स्पर्शसुख तूश्वेतशुक्ल शशिकर**
**प्रसादिक पुरंध्री तू वृच्छंखल नाजूक सकवार**

हे असं काही अफलातून हा कवी लिहून जातो.मन ओथंबल्या घनांचे होते.काव्यांत वेडे होते.मन काव्यसागरात डुंबत राहते. चंद्रखडी चांदणे अनुभवत राहते.एवढे उदात्त प्रेम, आभाळमाया गच्च भरलेल्या कविमनात सृजन पावते.

**मी सृजनधारा ललितरम्य सृजन बरवा नील अंबर**
**प्रणयाराधन आसमंत मी तू फुलपंखी चित्रविहार**
**मी अरुणतेज जळतेंबातले तू शीतसुगंधी लहर**
**राजीव नयना रती तू सोन पिवळा सोन प्रहर**

हा असा "नभ-यामिनी" मिलन प्रहराचा साक्षीदार होऊन शब्द फुलांना फुलकीत करणारा हा शब्द संभार कवी अतिशय कोमलपुष्पकरांनी मांडतो आहे.

आणि एक सुंदर ललनाचित्र दृष्टीपुढे साकार होते. त्याला साक्षांकित करून काव्यकाया प्रवेश करते. जलरंग देवता कवीला कृपावंत,प्रसन्न झालेली असल्याने रंगओघ चित्रात सुलयबध्द साकारतो. मिलनोत्सुक प्रहर उन्मादक होऊन हंस- हंसिनीच्या रूपात प्रणयाराधना करतानाचे निलजलरंग चित्र चित्तधुंद करते.

....... आणि या खंड काव्याचा रमनीय प्रवास सुरू होतो. सारस्वताला या गंध भरल्या यामिनीचा ललित गंध वेचन्यासाठी शब्दांचे चैतन्यफुले वाटेवर उधळी जाण्यास सांगते.

अकल्पीत
उच्चानुभवाचा साक्षात्कार
होण्यासाठी सज्ज
होण्यास सांगते.मग पुढे
किती सुंदर स्वर्गीय दृश्य
दिसते आहे पहा...
दिसतील खगांच्या शुभ्र
मेघमाला दलवेलींची हिरवी
कुरळी श्रृंखला
किंवा
**कुठे दिसतील राजहंस जळी**
**मिलनोत्सुक**
**तू पंखात घे तरुण चांदणी**
**मिलनोत्सक** व
**स्वरकंपू दे शामल वेळी चित्रविणा**
**तू आळव प्रियाविरहिणी मल्हारताना**
**संध्या रंग सांडतील जळात**
**स्मृत्यालंकृति**
**तू पद्मकलिका घे ओंजळीत गंधवती**




नीलकांती जलातील पद्मकलिका ओंजळीत घेण्याची कल्पना अतिरम्य वाटते.आपल्याच नादात धुंद असलेल्या सूर्यफुलांच्या रानात घडीभर सारस्वताचे प्राण ठेवण्याची कोमलार्त, केशरभिजल्या पिवळ्या उन्हातला सूर्यकिरणांचा तराना, तुझ्या राघववेळेच्या भक्तीमय अभंगाला साथ देईल.....आणि सांध्यलाली सारस्वताच्या अंगावरती भिनवून घेण्यास सांगणे. या कल्पना किती सुंदर!आशा मुग्ध वातावरणातून जाताना पवित्र आत्म्याचं निर्मळपण हृदयांकित होतं.मग पुढे स्वर्गीय अनुभव येत राहतो.....

**करेल संकरित तुला सृष्टीचा सृजनगंध बरवा**
**स्वर्गमाधुरी भाषेल तुला स्वरगंधाळलेली हवा**
**मालवताना आनंदांकुरून येईल सुवर्ण कांचनरवी**
**तू अर्पण कर तिथे तुझ्या नवजात शब्दांची पालवी**
**वर दिगंती दिसतील तुला आकाशस्थ पारवे**
**तू पंख दे पापण्या मिटून शब्दसुरांना नवे**
**हंबरून येता कामधेनू दुधाळून येईल श्यामपान्हा**
**तू शरण जा कृष्णकांती मधुश्यामल श्यामघनांना**
**कदंबकुसुमित रानात तुझा कंठ होईल सुरावह**
**तू आकंठ भरून घे तेव्हा तुझा तृष्णमयूर देह**
**कृष्ण काळ्या मेघांवरती येईल अंजनगर्द लाली**
**तू कंठ भरून गात रहा एखादी आर्त भूपाळी**

आशा एकासरस एक सघन काव्य रचना मनाला वेडे करून टाकतात. संध्यामग्न रवीरूपाचे लाल केशरी चैतन्य अवघ्या धरेला भारून टाकते आणि जलरंगात चित्रांकीत होते.अवघ्या महाराष्ट्राचे आणि तमाम वारकऱ्यांची विठ्ठल भक्ती या खंड काव्यात अंतर्भूत झाली नसती तरच नवल. मानवीय विचारधारेचा अखंड प्रवाह स्वतःकडे वाहता ठेवण्याचे स्वनियंत्री ओघाचे नित्यत्व आणि त्याचे सांप्रदायिक सृजन इथेही अबिर- गुलालात बेमालुमपणे मिसळलेले दिसते. नाजुकता किती टोकाची असावी याचे ठायी ठायी अनुभव यातील अनेक सौंदर्य ओळीतून दिसून येते. यातील रतियौवनाचे शृंगार वर्णन मुल्यात्मक दृष्ट्या कुठेही ढळत नाही हे ही तितकेच महत्वाचे वाटते. भावविभोर शब्दांचे चपखल योजन किमयागारी वाटते.

.....आणि मग लेखणीलाच सांजभूल पडावी एवढे सांध्यवर्णनाचे शब्द या ठिकाणी आपल्याला सांध्यस्नात झालेले दिसतात .पितवर्णलाली या चराचराला माखून टाकते.मंदिरावरचे कळस लक्षवेधी होतात.अभूतपुर्व प्रसन्नता सर्वत्र विलसत राहते.मन देवालयातील घंटानादाने हर्षकंपीत होते.उर्जावलये भोवती रुंजी घालत राहतात.

**मंदिरातले ऐकू येतील तुला**
**सनईचे सृजनबरवे सूर**
**तुझ्या हृदयात छुनछुनतील**
**तिचे रुणझुण नुपूर**
**वटवृक्षाखाली जरा घे गर्भस्त्रांत पद्मनाभ विसावा**
**तू आकंठून घे तिथली नादावलेली नादमुग्ध हवा**
**वेळू बनातून जाताना तुला होईल नव चैतन्याची चाहूल**
**तू कळ्या फुलांवर उमटवत जा आशा- निराशेची रानभूल**
**किनारलेले दिसतील तुला बगळे तरु तळ्याकाठी**
**तृणफुले वेचून घे तू तिच्या कुंतलात माळण्यासाठी**

अशी चित्रांकित काव्यरचना स्वर्ग वनातून जातानाचा अंतर्मग्न तृप्तीचा अनुभव देत राहते. रंगकामिनी विरहवारा रात्रभर तुला झोपू देणार नाही. तू नभातले तारे न्याहाळत बसशील. मग तू बासरी वाजवायला सुरुवात करशील.... आणि तेव्हा तुला तिच्या आठवणींचा संभार सोनकलिकांचा हार वाटेल. असे चित्र साईनाथ फुसे उभे करतात. यात प्रतिमा, प्रतीकांचा बेमालुम उपयोग करून या काव्यरचनेला एक स्वतंत्र अशी उंची प्राप्त करून देण्यात साईनाथ फुसे यशस्वी झाले आहेत असे मनोमन वाटते.

असे अप्रतिम खंड काव्य लिहिणारा कवी बघताना मात्र अतिशय साधा, जमिनीवरती पाय असले तरी नभात डोकं असणारा आणि अतिशय निर्मळ निगर्वी वाटतो. हे या कवीचं मोठेपण उठावदार आहे. तरीपण असे काव्य व्यवस्थेच्या दारी दुर्लक्षित राहिल्यासारखे वाटते हे दुर्दैव.

सर्वच ऋतूंचं स्वतःच्या अस्तित्वाने बहरुन जाणं आणि त्याला काव्य चित्रांकित करून ऋतू आणि प्रहरांना शृंगारिक करून हे काव्य कमालीचे नादमयी झाले आहे.

खंड काव्याची परंपरा अतिशय जुनी आहे. भारतीय साहित्यामध्ये सर्व काळामध्ये त्या त्या काळात खंड काव्य निर्माण झाले आणि त्यांनी त्या त्या काळाचा अमिट ठसा आपल्या खंडकाव्यामध्ये उमटवलेला दिसतो. आणि अशा खंड काव्याने भाषा समृद्धीच्या दृष्टीने भाषिक भर घालून मौलिक कार्य केलेले दिसते. अनेक नादमयी शब्द यामध्ये उठावदार झालेले दिसतात.

'छंदप्रिया उषासुंदरी, प्रियाविरहिणी मल्हार ताना, स्मृत्यालंकृति, किंशुक लाली, रवीबिंब शलआघ्य, सुचित्र चित्रांकीत, संकर्षित, मधुश्यामल श्यामघनांना,
पर्णपात्या शंखपुष्पी,ऋतु झंकार, कृष्णवेळ, रमलकांती, चित्रदरवळ, प्रमदा, उन्मादक आरोळी, अर्धओले क्षण, स्वरसुद्धा, पुरंध्री आशा अनेक सुंदर शब्दयोजनांनी या काव्याला बहर आला आहे.

कवीला अनेक रागांची माहिती असल्यामुळे आणि कवीने त्या त्या प्रहर वेळा त्या त्या रागांनी अंकित केलेल्या आहेत. त्या त्या ऋतूतील निसर्गाचं अतिसुरेख चित्र या रागोल्लेखाने अधोरेखित झालेले आहे. म्हणून त्या त्या ऋतूतील निसर्गाचे रूपसौंदर्य या काव्यातून सचित्र मांडण्यामध्ये कवी अतिशय सशक्तपणे यशस्वी झाला आहे. स्वर्गीय अप्सरांचा शरीरपुष्ठ कमनीय बांधा शरीरशास्त्रीय अभ्यासामुळे चित्रसौंदर्यात प्रमाणबध्दता साधली आहे. नितळ नव्हाळी कायेला सौंदर्याराराधनेत सुबकता आली आहे.या खंडकाव्याने एकाचवेळी पंचेंद्रीयाना अनुभव जाणिवेचा आनंद देण्याची गोडी त्याने प्राप्त केली आहे.

**अलगद अलवार ओठांनी तिचे घेशील तू केशर चुंबन**
**जीव्हाग्रावर ओशाळतील तिचे आधीर कुवार स्तन**
**उन्मिलित होतील देहात तुझ्या असंख्य अनुराग कळ्या**
**कचपाशात होतील तिच्या पल्लेदार बटा मोकळ्या**

असं अतिशय हळव्या काव्यशृंगाराला अधिक सखोल करून त्याच्यातील 'काव्य' रसिक मनाला भुरळ पाडत राहतं. रसिकमन या काव्य पाशात कधी जातं हे देखील कळत नाही. आणि या खंड काव्याचा शेवट सुद्धा तेवढाच परिमळगंधात न्हाऊन अतिशय सक्षमपणे या निरोपाच्या हळव्या क्षणातही जगून घेतल्या क्षणाक्षणाचा स्मृतीसहवास जाताना सोबत करील आणि हा प्रवासही अतिशय आनंदमय होण्यासाठी भरून पावेल. असे हे अतिशय सुंदर खंडकाव्य पुन्हा- पुन्हा वाचून या परिमळगंधाच्या सहवासातून बाहेर येऊ नये असे वाटत राहते. हीच या खंडकाव्याची अखंड शक्ती आहे. पुन्हा एकदा साईनाथ फुसे या कवीकडून असे खंडकाव्य फुलत राहो ही सदिच्छा व्यक्त करून कविमित्राला पुढील काव्य प्रवासासाठी मनभरून शुभेच्छा.

**पुस्तक परीक्षणः**
- **चित्रपल्लव स्वरसमिधा**
- **कवीः साईनाथ फुसे**
- **संवाद प्रकाशन**
- **मुल्य :२२५ रू**

# संसार हा शाश्वत नसून मायेचा विस्तार



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपण ज्याला संसार समजतो तो शाश्वत नसुन मायेचा विस्तार आहे .जे जे नशीवंत आहे तीच नेमकी माया असते आणि आपणं शाश्वत सोडून जे नशीवंत आहे त्या मागे धावतो . शाश्वत काय नशीवंत काय हे उमजलं तर जीवनात माया आपला प्रभाव आपल्यावर निर्माण करू शकत नाही. माया आपल्यावर जितकी जास्त स्वार आहे तितकेच अधिक आपण दुःखी होतो .मायेचा विस्तार जितका मर्यादित तितकंच दुःख मर्यादित आणि मायेचा विस्तार जितका जास्त तितकंच दुःख जास्त म्हणून हाच विस्तार करत करत असताना जीवन ज्ञान समजलं तर फार अडचणी निर्माण होत नाहीत. नौका समुद्रात असुन देखील पाण्याच्या मोहापासून दुर असते आणि म्हणूनच नौका पैलतीरावर पोहचते.**

जर चुकुन नौकेत पाणी शिरले तर नौका बुडते त्याच प्रमाणे जीवनात मायेच्या पाशात आडकू नका नक्कीच हित होईल. संसारा हा माय रूपी भवसिंधु आहे.आणि माया आपल्याला खेळवते आणि आपलं आयुष्य डुबवते.परंतु हि बाब आपल्या वेळीच लक्षात येऊन सागारतील नौके सारखं सहीसलामत पैलतीरावर जाता आलं आहे. महासागरातील नौका हि असंख्य लाटा, अधुन मधुन समुद्रात उठणारी भयनक अशी वादळ, सुसाट वारा या सारख्या ,अनंत अशा संकटांने विचलित न होता आपला पैलतीरावर जाण्याचा प्रवास अगदी व्यवस्थित पणे हळूहळू पुर्ण करते आणि समुद्रातील पाण्यामध्ये असणारी नाव ज्या प्रमाणे पाण्यात असुन सुद्धा नावेत पाणी प्रवेश करू शकत नाही आणि नाव आपला जो नियोजित प्रवास आहे तो अगदी योग्य पद्धतीने कुठल्याही संकटा शिवाय पुर्ण करते .त्याच प्रमाणे आपण सुद्धा मानवी जीवन जगत असताना व या माया रूपी संसारात वावरताना तसेच या जगात फिरत असतान आपल्या आजूबाजूला असणार भौतिक मायारूपी पाणी हे आपल्या संसार रूपी नावे मध्ये प्रवेश करू शकले नाही पाहिजे तसेच बाह्य वातावरणाचा तसेच भौतिक जगाला आपल्या मध्ये प्रवेश करू दिला नाही पाहिजे. तर आपलं जीवन व्यवस्थित नौके प्रमाणे पैलतीरावर जाऊ शकते. म्हणजे आपलं जीवन हे नावे प्रमाणे असावं आपण पाण्या मध्ये चालणारी नाव कधी पाहिली आहे का आणि जर पाहिली असेल तर आपण लक्षपूर्वक आठवाव नौकेचा थोडासाच पृष्ठ भाग हा पाण्यात असतो.आणि वरच्या बाजुचा बहुतांश भाग हा पाण्यावर तरंगत असतो. म्हणजे नेमके काय तर पाण्यावर समतोल साधण्यासाठी जे काही विशेष खास असे काला गुण आवश्यक आहेत. ते काला गुण नावे ने आवगत केले आहेत . आणि म्हणूनच नौका पाण्यावर तरंगत प्रवाहाच्या दिशेने हळूहळू मार्गस्थ होते आणि आपल्या नियोजित मुक्कामाचे असणारे शेवटचे ठिकाण गाठते . त्याच प्रमाणे मानवाने सुद्धा आपली जीवन रुपी नाव हि मायारूप पाण्यात अशाच पद्धतीने तरंगायला हवी . जेणेकरून आपण मायारूपी जगात जीवन जगत असताना विविध साधनांचा वापर हा आपल्या विकासासाठी करून घेतला पाहिजे. परंतु हा वापर करून घेत असताना आपल्याला निरपेक्ष भावनेने पुढे जाता आलं पाहिजे आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचता आलं पाहिजे आणि याच दरम्यान आपण आपल्या वास्तविक ध्येय पर्यंत पोहोचत असताना या मायेच्या संसारिक गोष्टींना आपल्यामध्ये प्रवेश करू द्यायचा नाही.हेच महत्वाचे आहे जसं पाण्यात चालणारी नाव ही आपल्यामध्ये समुद्रातील अथांग पाणी शिरू देत नाही. त्याच प्रमाणे संसाराच्या पैलतीरावर जात असताना मायारूपी शक्ती चा प्रवेश आपल्या मध्ये झाला नाही पाहिजे .पाण्यात चालणारी नाव त्यामध्ये जर पाणी शिरले तर ती बुडण्याची दाट शक्यता असते आणि त्याच प्रमाणे संसार रुपी जीवनामध्ये जगत असताना त्या मध्ये मोहमाया शिरली तर मग मात्र संसार रुपी नाव हि नक्कीच बुडल्याशिवाय राहत नाही आणि पर्यायाने जीवनातील मुक्ती चा प्रवास हा त्याच ठिकाणी थांबतो. हा प्रवास थांबवायचं नसेल आणि आपल्याला योग्य ठिकाणी पोहोचायचं असेल तर आपलं जीवन हे पाण्यात चालणाऱ्या नावे प्रमाणे असलं पाहिजे. आणि नियोजित ठिकाणी नाव ज्याप्रमाणे पोहचते त्याच प्रमाणे आपल्या आपल्या जीवनातील सर्व जबाबदारी कर्तव्य पुर्ण करुन पार पाडुन योग्य ठिकाणी पोहचता आलं पाहिजे. आपण जितक जास्तीत जास्त कृतीशील ज्ञान अर्जित करू तितक आपलं जीवन सहज आणि सुलभ होईल.



# सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावावर अश्लीलता चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र हे सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असे राज्य आहे. ग्रामीण भागातून आजही विविध समाजगट ही संपन्नता जोपासत आहेत. समाजाच्या विविध गटांतून तयार झालेली गीते, नाचाचे प्रकार, कविता, संकल्पना यांचा समावेश लोककलांमध्ये होतो.या लोककलांमधुंच लोकरंगभूमी विकसित झाली.कीर्तन ,दशावतार तसेच गावांमधून होणाऱ्या जत्रा -उत्सवामधून होणारे वगनाट्य, तमाशा, लोकनाट्य, विधीनाट्य ,बहुरूपी , डोंबाऱ्याचे खेळ,पोवाडा, गोंधळ ,जागरण, कलगीतुरा, लळीत ,बहुरूपे ,कुडमुडे जोशी, वासुदेव, यात लोककलांमध्ये रंगभूमीची बीजे दिसतात.मात्र वर्तमान स्थितित लोककलेच्या माध्यमातून आश्रिलतेचे प्रकार मोठ्यप्रमाणावर होत आहे.पारंपरिक लोककलांचा प्रचार व प्रसार अधिकाधिक होऊन लोककलांचे जतन व्हायला पाहिजे..**

मात्र लोककलेच्या नावावर वर्तमान स्थितित आश्लितेचे प्रदर्शन प्रकार मोठ्यप्रमाणावर होत आहे. मागील वर्षी. नागपूर जिल्हातील उमरेड तालुक्यातील ब्राम्हणी गावात सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावावर करण्यात आलेल्या आयोजनात काही तरुण आणि तरुणींनी विवस्त्र होऊन केलेल्या अश्लील डान्स प्रकरणात उमरेड पोलिसांनी गुन्हा नोंदवला होता. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावावर आयोजित डान्स हंगामा कार्यक्रमात अश्लील नग्न डान्सचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण जिल्हातच नाही तर राज्यभर एकच खळबळ माजली होती.

गौतमी पाटील हिच्यावर देखील लावणीच्या नावावर अश्लील नृत्य केल्याचा आरोप झाला. नंतर त्यांनी या प्रकरणी माफी देखील मागितली गौतमी पाटील अल्पावधीतच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गेलं आहे. लावणी नृत्यांगणा म्हणून गौतमीने नावलौकिक मिळवला आहे. गौतमी ही मूळची धुळ्याची आहे. सप्टेंबर २०२२मध्ये एका शोमध्ये तिने डान्सच्या काही अश्लील स्टेप्स केल्या होत्या. त्यामुळे तिचा हा डान्स वादग्रस्त ठरला होता. या डान्सवरून तिच्यावर प्रचंड टीकाही झाली होती.

लावणी कलावंतांनीही गौतमीच्या डान्सवर आक्षेप घेतला होता. मराठी सिनेसृष्टीतूनही त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. गौतमीवर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीनेही जोर धरला होता. त्यानंतर तिने जाहीरपणे माफी मागितली होती.

काहीसा असाच प्रकार विदर्भातील भंडारा जिल्ह्यात नुकतेच खडीगंमत कार्यक्रमांतर्गत घडलेली अश्लीलता सध्या चर्चेचा मोठा विषय झाला आहे. भंडारा जिल्ह्यातील खडीगंमत कार्यक्रमात महिलांवर पैसा उघडणे त्यांचे विवस्त्र नृत्य घडवून आणणे या घटना घडल्या. ज्या अतिशय चिंताजनक आहे. महिलांवर पैसे उधळणे, त्यांचे विवस्त्र नृत्य घडवून आणणे



या घटना अत्यंत गंभीर आहेत. यासाठी परराज्यातूनही तरुणींना आणलं जातंय, अशा तक्रारी आहेत. अशा कोणत्याही कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परवानगी देताना अत्यंत कडक अटी व शर्ती घालण्यात याव्यात पण आयोजकांनी बिनदिक्कतपणे सांस्कृतीक कार्यक्रमाच्या नावावर अश्लील नृत्य करून खडी गंमत कलेला गालबोट लावलेला आहे.

विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोरे यांनी देखील खडीगंमत या अश्लील नृत्य प्रकारावर चिंता व्यक्त केली. भंडारा जिल्ह्यातील खडीगंमत कार्यक्रमात महिलांवर पैसा उधळणे, त्यांचे विवस्त्र नृत्य घडवून आणणे या घटना महिलांच्या मानवी हक्कावर गदा आणणारी, अपमानकारक तसेच त्यांना तुच्छ वागणूक देणारी आहे. खडीगंमत व तत्सम कला आयोजनासाठी परवानगी देताना कडक अटी व शर्तींची कसोसीने पूर्तता होणे आवश्यक आहे.असे देखील त्यांनी म्हंटले. नियमांचे उल्लंघन करून हे आयोजन करण्यात आल्याचे सकृत दर्शनी दिसून येते.असाही आरोप गोरे यांनी केले. ओडिसा, छत्तीसगड आदी राज्यांतून अल्पवयीन मुलींना लावणीच्या नावाने आणण्यात आले होते. प्रत्यक्षात अशा कार्यक्रमांना परराज्यातून मुली आणताना संबंधित यंत्रणेची परवानगी घेण्यात आलेली नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून, आंतरराज्य मानव तस्करीची ही घटना दिसून येते. संबंधित राज्यांना या घटनेसंदर्भात अवगत करून माहिती घ्यावी तसेच राज्यात अशा आयोजनासाठी होत असलेल्या आंतरराज्य मानव तस्करीवर प्रतिबंध आणावा, असे निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी दिले. अशा आयोजनातील गुन्ह्यांबाबत डान्सबार विरोधी कायद्यातील विविध कलमांच्या आधारे कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. विदर्भात खडी गंमत लोककलेचे पश्चिम महाराष्ट्राप्रमाणेच फड असतात. पश्चिम महाराष्ट्रात त्याला लावणी किंवा तमाशा म्हणतात तर विदर्भात त्याला खडी गंमत किंवा खडा तमाशा म्हणतात.ही लोककलासुद्धा पश्चिम महाराष्ट्रातल्या तमाशाएवढीच किंवा त्याहून जुनी आणि लोकप्रिय आहे. तमाशाचं मूळरूप म्हणूनसुद्धा याकडे पाहिलं जातं. तसंच पश्चिम महाराष्ट्रातल्या तमाशाचं जुळं भावंड म्हणूनसुद्धा खडी गंमतचा उल्लेख होतो.

पण या खडी गंमत किंवा खड्या तमाशात आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या तमाशात एक मुलभूत फरक आहे...तो म्हणजे, विदर्भात ही कला पारंपरिकरीत्या फक्त पुरुषच सादर करतात. खडी गंमतगेल्या काही वर्षांत महिलांचाही त्यात सहभाग झाला आहे, पण तो शाहिरीपुरता मर्यादित आहे. नाचकाम किंवा नृत्य हे पुरुषच महिलेचं रूप घेऊन करतात आणि भल्याभल्यांना विश्वास बसणार नाही एवढ्या चपखलपणे हे पुरुष ही कला सादर करतात.

पण खडी गंमत म्हणजे फक्त एवढंच नाही. या कलेला एक मोठा एतिहास आहे, परंपरा आहे आणि आधुनिकतासुद्धा आहे.अनेकांना ही लोककला फक्त ग्रामीण आणि अश्लील वाटते, तर अनेकांना ती निखळ मनोरंजन वाटते. ग्रामीण भागात प्रबोधनासाठीसुद्धा तिचा वापर झालाय. संतांनीसुद्धा या लोककलेचा वापर प्रबोधनासाठी केला आहे.मात्र आता या कलेला अश्लिलतेची किनार लागल्याची टिप्पणी होत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावावर अश्लिलता नको एवढेच सांगावेसे वाटते.

# चांदई ठोंबरी ते सिंगापूर; एका युवकाचा अविस्मरणीय प्रवास...

आधुनिक केसरी


**जालना जिल्ह्यातील चांदई ठोंबरी या गावातील भूमिपुत्र देवा गाडेकर याचा मुख्य भूमिकेत असलेला मराठी चित्रपट वल्ली हा सिंगापूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल मध्ये दाखवण्यात येणार आहे. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. आणि त्यासाठी त्याला उत्कृष्ट अभिनेता यासाठी देखील नामांकन मिळालं आहे. देवा गाडेकर हा चांदई ठोंबरी ते सिंगापूर प्रवास करणारा एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. तो बऱ्याच वर्षांपासून नाटक आणि सिनेमा या क्षेत्रांशी कार्यरत आहे. आई वडील दोघेही शेतकरी आहे.वल्ली या सिनेमाचं विशेष हे की याचं शूटिंग त्याच्याच गावात म्हणजे चांदई ठोंबरी ता.भोकरदन या ठिकाणी झालं आहे. या गोष्टीचा गावकऱ्यांना अतिशय आनंद होत आहे. .मराठवाड्यातील स्थानिक कलाकारांचा मोठा भाग असलेला वल्ली हा चित्रपट.आपल्या सगळ्यांच्या आनंदात आणखी एक भर घालणारी ही बातमी आहे.**

देवा सखाराम गाडेकर याने आपलं शालेय शिक्षण चांदई ठोंबरी आणि केळीगव्हाण इथं पूर्ण केलं, नंतर जालना इथं ITI करून काही काळ त्याने जॉब ही केला.

नंतर तो नाट्यक्षेत्राकडे वळला. त्याने नाटकात आपलं B.A IN THEATRE संभाजीनगर च्या एस. बी. महाविद्यालयातुन केलं व पुढे M. A IN THEATRE साठी तो सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, ललित कला केंद्र इथं गेला.

देवा गाडेकर याला आजही मुख्य हंगामात शेती च्या कामासाठी जावं लागतं. त्याला या कामात खुप समाधान आणि सुख वाटतं, तो म्हणतो की हे काम मला नेहमी नवी चेतना देत राहतं, माझ्या अभिनयासाठी, या माती सोबत वेगळी अनुभूती येते आणि उत्तम चिंतन मनन होत राहतं. मी संभाजीनगर ते पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्र, या जागेने, इथल्या शिक्षकांनी अभिनयाचा एक विराट स्वरुप समोर मांडलं जसं की कृष्णाच्या मुखात यशोदेला दिसलं होतं, ही अतिशयोक्ती वाटेल पण हे आसच आहे. आता ह्या वावटळीत उडी घेतलीच आहे तर, काही छोटं मोठं समाधान पुरेस राहत नाही, मग सिनेमा हे एक माध्यम आहे जिथं दिग्दर्शक लोकांशी ह्या सगळी घसट होऊ लागली आणि आता वल्ली हा सिनेमा करतांना माझ्या नकळत माझी सगळी ताकत सगळे विचार, अनुभव या भोवती आले, आणि मी केलं आसं न म्हणता ते काम होत गेलं, यासाठी दिग्दर्शक मनोज शिंदे सर ही त्या विचाराशीच शीच नातं सांगणारे होते, आणि त्यांच्या या सोबतीने आज वल्ली हा सिनेमा जागतीक पातळीवर ऊभा आहे.पुढे देवा आपल्या साकारलेल्या पात्राविषयी असं म्हणतो की, वल्ली हे पात्र माझ्या शक्यतांना डिवचणारं होतं, मी खूप मार्गाने त्याला पकडायचं ठरवलं पण ते तिथं नसायच, थोडासा चकवा व्हायचा माझ्या सोबत, पण ते होतं त्याच्या गाण्यांमध्ये दडलेलं, म्हणून ते गाण्यातून खुप सुंदर ऊभ राहतं, ह्या भुमिकेने नटाला दाखवलेला रस्ता भारी आहे.

सोबतच या पात्रा साठी उत्कृष्ट अभिनयासाठी त्याला नामांकन मिळालं आहे. राष्ट्रीय पातळीवरील




ऊत्कृष्ट अभिनेत्या सोबत STAGE SHARE करतांना प्रचंड आनंद होत आहे आणि संपूर्ण देशातुन फक्त आपणच आसणं, हे आभिमाना सोबतच CRAFT चा विजय आहे.

शेती जी नेहमी् जिवंत करुन, एक ऊर्जा भरते, तितकच ललित कला केंद्राने ही दिलंय, सोबत मनोज शिंदे यांनी जो विश्वास दाखवला सर्वांचा मी नेहमीच ऋणी आसेल.त्याचबरोबर माझ्या गावातील लोकं, त्यांचं सहकार्य यांचा पण एक सिंहाचा वाटा आहे या चित्रपटाच्या निर्मितीसाठी त्यामुळे त्यांचे हे ऋण मी विसरू शकत नाही. आणि मी सिंगापूर ला जागतिक स्तरावर माझ्यासोबत माझ्या गावाला,तिथल्या संस्कृतीला,व भाषेला घेऊन जातोय या गोष्टीचा मला जास्त अभिमान आहे.


कथेचा नायक वल्ली, जो जोगता परंपरेचा अनुयायी आहे- प्राथमिक पुरुषाच्या शरीरात जन्मलेला आणि बहुरूपाने स्वतःला स्त्री म्हणून दर्शवणारा व्यक्ती. या दशकभरात, वल्लीला जाणवते की त्याचा खरा पुरुषार्थ अत्यंत उपेक्षित राहीलाय. शारिरीक हल्ले, सामाजिक उपहास आणि सार्वजनिक छळ सहन करत, वल्ली परंपरेच्या बंधनातून मुक्त होण्याचा निर्णय घेतो आणि शहरी जीवनातील कठोर वास्तवांना तोंड देण्यासाठी तारासोबत प्रवास सुरू करतो.

सिंगापूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल (@ SGIFFEST) मध्ये 'वल्ली' या सिनेमाचा जागतिक प्रीमियर नंतर,

29व्या कोलकाता इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल 2023 ( @KIFF_OFFICIAL ) मध्ये मुख्य स्पर्धेसाठी देखील 'वल्ली'ची निवड झाली आहे आणि त्याच्या राष्ट्रीय प्रीमियरसाठी तयार आहे, पुढे 'वल्ली' ची ९व्या अजिंठा एलोरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2024 ( @AEIFFEST ) मध्ये भारतीय चित्रपट स्पर्धेत अधिकृत निवड झाली आहे.

देवा गाडेकर याच्या अभिनय क्षेत्रातील प्रवासासाठी मराठवाड्यातील नाट्य व चित्रपट सृष्टीतील अनेक मान्यवर सह गावकरी यांनी शुभेच्छा दिल्या आहे.

# भारतीय नौदल दिन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते.**

१९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले.



आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते.

# इंडिया आघाडीची कबर कोणी खोदली ?




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**कॉंग्रस पक्षाने गांधी गांधी परिवाराच्या नेतृत्वाखाली पाच राज्यातील विधानसभा निवडणुका लढविल्या.यावेळी कॉंग्रेसने जातीय जनगणना, जुनी निवृत्ती वेतन या अजेंड्यावर पाच राज्यात सत्ता मिळविण्याचे स्वप्न रचले होते! पण नरेंद्र मोदींच्या कुशल नेतृत्वाखाली भाजपाने कॉंग्रेसचे स्वप्न धुळीले मिळविले.कॉंग्रेसच्या जातीयवाद,तुष्टीकरण भ्रष्टाचार आणि परिवारवादी या नीतीला मतदारांनी धडा शिकविला आहे. सुंभ जळला तरी पीळ गेला नाही, त्याप्रमाणे कॉंग्रेस पक्षाने आता उत्तर विरुध्द दक्षिण भारत अशी देशाची विभागणीची भाषा सुरु केली आहे. आता २०२४ च्या निवडणुकीत इंडिया आघाडी मोदींच्या नेतृत्वासमोर टिकेल काय? असा प्रश्न आहे. देशाच्या अमृत महोत्सव साजरा करत असताना राज्यातील निवडणूका या विकासाच्या मुद्दावर व्हायला पाहिजेत! पण आज पाच राज्यातील निवडणुका पाहिल्या तर जातीय समीकरण,धर्म,आणि सवंग घोषणा या मुद्दावर लढविल्या गेल्या आहेत.**

स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये १९६९ पर्यंत तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू व श्रीमती इंदिरा गांधीं यांनी देशात जातीय जनगणेला विरोध केला. देशात 'जात' हा शब्द हद्दपार केला गेला पाहिजे! असे म्हंटले.पण आता कॉंग्रेसमधील गांधी परिवार हा जायीय वादाला उघडपणे खतपाणी घालत आहे. इतकेच नव्हे राज्यात आमची सत्ता आली तर आम्ही जायीयजनगणना करू,असे आश्वासन दिले होते. पाच राज्याच्या निवडणुकीत राहुल गांधींनी जातीयजनगणेचा मुख्य मुद्दा बनवला होता.यामुळे जातीचे धुव्रीकरण होवून भाजपाचा पराभूत होईल,असे राजकीय गणित होते.तसेच कमी किंमतीत गॅस देणे,जुनी पेन्शन योजना लागू करणे आदी अनेक सवंग योजना घोषणा कॉंग्रेस कडून केल्या जात होत्या.त्याची ग्यारंटी गांधी परिवार देत होता.पण पाच राज्याची आर्थिक परिस्थीती, विकास, बेरोजगारांचा प्रश्न, महागाई हे प्रश्न महत्वाचे वाटले नाही.कॉंग्रेसला राजस्थान,छत्तीसगड राज्यात सत्ता वापसी होईल असेवाटत होते.तर मध्यप्रदेशमध्ये भाजपाचा हा पराभूत होऊन कॉंग्रेसची सत्ता येईल,याचे स्वप्न पहात होता.पण झाले उलटे!

राजस्थानमध्ये १९४९ ते१९९० पर्यंत कॉंग्रेस पक्षाची सत्ता होती.१९९० नंतर कॉंग्रेस आणि भाजपात सत्ता बदलाची परंपरा सुरु झाली.त्यामुळे २०२३ निवडणुकीत ही परंपरा मोडीत काढण्याचा गहिलोत सरकारने ठरविले होते.२०१८ मध्ये राहूल गांधी यांनी तर दहा आकडे,म्हणेपर्यंत राज्यातील सर्वच शेतकर्‍यांचे कर्ज माफ होईल! असे आश्वासन दिले.पण कॉंग्रेसच्या गहिलोत सरकार पाच वर्षे झाले तरी सपूंर्ण कर्जमाफी देऊ शकलेले नाहीत. ही वस्तुस्थीती आहे.त्यामुळे गांधींनी शेतकर्‍यांना धोका दिला,याची भावना निर्माण झाली.कॉंग्रेस या निवडणुकीत विद्यमान आमदार व मंत्र्याना उमेदवारी नाकारुन तरूणांना संधी देईल असे जात होते,पण प्रत्यक्षात तसे झालेच नाही,त्यामुळे पक्षात विद्यमान आमदार व मंत्र्यांना मतदार संघातील नाराजी भोवली.यात कॉंग्रेस पक्षात अशोक गहिलोत व सचिन पायलट हे दोन गट होते.राहुल गांधी व प्रियंका वाड्रा यांचे सभेला ये दोन नेते एकत्र दिसत होते.आपल्यासोबत यांची छबी काढूनएकत्रित असल्याचा भासविण्याचा प्रयत्न झाला पण गहिलोत व पायलट दोघे प्रचारात कधीच एकत्र दिसले नाहीत व त्यांनी सभा घेतली नाही.त्यामुळे कॉंग्रेस पक्षांतर्गत गटबाजी फटका बसलेला आहे.पायलट यांच्या नेतृत्वामुळे मागील निवडणुकीत कॉंग्रेस बहुसंख्य गुर्जर समाज साथ दिली होती.यावेळी कॉंग्रेस पक्षाने पायलट यांना राज्याचे नेतृत्व न दिल्याने गुर्जर समाजाने यावेळी साथ दिली नाही. त्यात राजपूत समाज कॉंग्रेसच्या विरोध केला आहे. राज्यातील गुर्जर व राजपूत समाजांचा विरोध हा कॉंग्रेसच्या पराभवाचे कारण मानले जाते! गहिलोत



सरकार शेतकरी, महिला, मजूर व गरीब यांचे रोज नवीन घोषणा करत होते!पण प्रत्यक्षात त्या योजना लोकपर्यंत पोहचत नव्हत्या.यात चिरंजीवी योजना तर कागदावर राहिली! त्यामुळे सवंग योजना घोषणा करुनही कॉंग्रेसला मध्यम व गरीब कुटुंबाची सहानुभूती मिळाली नाही गहिलोत सरकारवर वर पेपर लिक व लाल डायरी या दोन भ्रष्टाचाराचे प्रकरण भाजपाने उचलून धरले होते.तो प्रश्न कॉंग्रेसफक्षाला खोडून काढता आलेला नाही. राज्यातील महिलांवरचे वाढते अत्याचार व कायदा सुव्यवस्था ढासळली. होती.त्यात कन्हैय्यालाल यांची मुस्लिम कट्टरवाद्यांनी निर्दयीपणे केलेली हत्या.भाजपाने हे प्रकरण निवडणुकीत उचलून धरला!या घटनेमुळे हिंदू समाज हा संतप्त झालेला होता.मोदीनी या राज्यात २४ सभा घेतल्या त्याच्या प्रभाव मतदारावर पडला.भाजपाने विकासाची मोदी ग्यारंटी दिली! गांधी व वाड्रा व खडगे यांनी प्रचार सभा घेतल्या पण त्यांचा प्रभाव मतदारावर पडलेला नाही.हे स्पट दिसून आले.यामुळे राजस्थान- मधील कॉंग्रेसची सत्ता गेली! ती भाजपाने खेचून घेतली आहे.असेच म्हणावे लागेल!

मध्यप्रदेशमध्ये सत्ता परिवंतन होईल,असे सांगितले जात होते! या राज्यात २०१८ मध्ये कॉंग्रेसचे सरकार आले होते? पण मुख्यमंत्री कमलनाथ यांना सत्ता सांभाळता आली नाही.पण कॉंग्रेसच्या वीस आमदारांनी पक्ष सोडला! यामुळे कॉंग्रेसचे या राज्यातील सत्ता गेली. देशात मोदींची लाट असताना कॉंग्रेसला राज्यात यश मिळाल्याने आता या राज्यात सत्ता होणार अश्या वावड्या, कॉंग्रेस नेते व मोदी विरोधक उठवित होते! भाजपाने शिवराजसिंह चौहान यांचेकडे राज्याची सूत्रे सोपविली.शिवराजसिंह हे जमीनीवर काम करणारे नेते आहेत!कॉंग्रेसने भाजपाने सवंग घोषणा सुरु केल्या! यात हे राज्य आघाडीवर होते! शिवराजसिंह यांची लाडली योजनेचा १ कोटी ३१ लाख महिला मतदारांना प्रभावित करणारी ठरली आहे.या योजनेत आता महिलांना तीन हजार वाढ करण्याची ग्यारंटी दिली गेली.त्यात राज्यात मोदी सरकारच्या मोफत धान्य योजना,आवास योजना, पाच लाखात वैद्यकीय उपचार या योजना राबविण्यावर भर दिला गेला!दुसरीकडे कॉंग्रेस पक्षाने या राज्यात इंडिया आघाडीच्या मित्र पक्ष असलेल्या "सपा'ला सोबत घेणे नाकारले! सपाने नेते अखिलेश नाराज झाले, यांनी कॉंग्रेसला मते देऊ नका! असा सांगितले! यामुळे विरोधी इंडिया आघाडीत तीव्र मतभेद निर्माण झाले असून,याचा कॉंग्रेस फटका बसला आहे.या राज्यात कॉंग्रेस फक्षाचा आत्मविश्वास नडला व अंहकारामुळे हाती गमावली आहे.

छत्तीसगड राज्यात भूपेश बघेल यांच्या नेतृत्वामुळे येथे भाजपाला यश मिळणे कठीणच आहे.असे सर्वच वृत्त वाहिन्यांनी निवडणूकपूर्व आणि मतदानानंतर या राज्यात व कॉंग्रेसलाच विजय मिळेल,असाच अंदाज व्यक्त केला.पण भाजपा वृत्त वाहिन्यांचा चाचणी अंदाज खोटा ठरविला आहे.या राज्यात आदीवासी मतदारांची संख्या अधिक आहे. मोदी व भाजपाने निवडणूकआदिवासी भागात जावून सहभाग घेतला!इतकेच नव्हे,भूमीहिन व शेतमजूरांना प्रतिवर्षी दहा हजार रुपये आर्थिक मदतीचे आश्वहन दिले.पण बघेल यांच्या कार्यकाळातील शेण घोटाळा व महादेव ॲप चे करोडा रुपायांच्या घाटोळ्याचे प्रकरण लावून धरले! त्यामुळे बघेल यांचेवर भ्रष्टाचारावर डाग लागला. त्यांनी भाजपाने ईडी, व सी.बी आस. उमेदवार उभे केले असेउत्तर दिले, पण याचे स्पष्टीकरण दिले नाही.त्यामुळे बघेल सरकारच्या सत्तेच्या विरोधात नकारात्मक वातारण निर्माण झाले!त्यामुळे कॉंग्रेसला पराभव झटका बसला. कॉंग्रेसने राजस्थानात गहिलोत व छत्तीसगड बघेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला तो घातक ठरला! उलट भाजपाने राजस्थान व मध्यप्रदेश मध्ये मुख्यमंत्र्याचे नाव जाहीर केले नाही? ते गुपीत ठेवले. भाजपाने जर निवडणुकीत मुख्यमंत्र्याच्या चेहर्‍यावर निवडणूक लढविली असती तर भाजपाला पक्षांर्गत नाराजीला तोंड द्यावे लागले असते!

तेलगंणा राज्यातके.चंद्रशेखर राव भारत राष्ट्र समिती पक्षाने राज्यात रयथू बंधू,व दलित बंधू या योजनेच्या पक्षाचा झेंडा जोरावर राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न सुरु केला होता.त्यानी मोदीनेतृत्वाला आव्हान दिले. चंद्रबाबूनायडू,व मल्लीकार्जून खडगे नेत्यांनी असेच केले त्यांना मतदारांनी बसविले.त्याप्रमाणे केसी आर ने सत्ता गमावली.कॉंग्रेसला स् या राज्यात यश मिळेल हे स्वप्नात वाटत नव्हते. राज्यातील मुस्लिम व दलितांचे मते निर्णायक ठरतात.यात एका कट्टर इस्लामी धार्मिक संघटनेने 'केसी आर' ला साथ देणे हे भाजपाची मत देण्यासारखे असा अप्रचार केला. मुस्लिमांनी कॉंग्रेसला साथ देण्याचे व्हान केले गेले.तर कॉंग्रेसने हमाम दिलेला पाठिंबा,केरळ येथे मुस्लिम लिंग सोबत हमास समर्थनाथ घेतली जाहीर सभा,याचा परिणाम कर्नाटकप्रमाणे मुस्लिमांचे मतांची कॉंग्रेसला साथ दिली व त्यामुळे या राज्यात कॉंग्रेसला विजयी मिळालेला.त्यात कॉंग्रेसने रेवंथ रेड्डी यांना प्रदेश केले.त्यामुळे रेड्डी समाज व आर्थिक कॉंग्रेसला मिळाले.या रेड्डीने गांधी यांचे राहुल गांधीच्या भारत जोडोचे नियोजन चांगलेकेले होते. या रेवंथू रेड्डींना मताच्या बदल्यात नोट या प्रकरणात अटक झाली होती.राज्यात कॉंग्रेस यश मिळाले व रेड्डी हे मुख्यमंत्र्याच्या स्पर्धेत असल्यानी स्वागतासाठी उतावीळ झालेल्या पोलिस महानिदेशक अंजलीकुमार हे स्वागतासाठी गेले होते. त्यामुळे निवडणूक विभागाने हा आचारसंहितेचा भंग मानत त्यांना निलंबित केले आहे.

मिझोराम हे खिश्चन बहुल असलेला राज्य आहे.या राज्यात मिझो नॅशनल फ्रंट या सत्ताधारी पक्षाच्या विरोधात मतदारांनी कौल दिला आहे जोरम पीपल्स मुव्हमेट (झेड.पी.एम. )पक्षाने सर्वात २७ जागेवर विजय मिळविला आहे.तर सत्ताधारी मिझो नॅशनल फ्रंट (एम.एन. एफ ) या पक्षाला केवळ दहा जागेवर विजय मिळाला. विशेष म्हणजे,या राज्यात भाजपाने दोन उमेदवार निवडून आले,कॉंग्रेसचा केवळ एक उमेदवार निवडून आला आहे.

पाच राज्यातील निवडणुकीत मोदी नेतृत्वाने भाजपाला यश मिळवून दिले आहे.देशात मोदींचे प्रभाव अजून कायम आहे, हेविरोधी पक्षांनी मान्य केले असावे!कॉंग्रेसचे राहुल गांधी व प्रियंका वाड्रा या नेतृत्वाचा प्रभाव पडलेला नाही.गांधी यांच्या भारत जोडो यात्रा व मोहब्बत दुकान नाटकी प्रकाराला लाथाडले आहे.कॉंग्रेसच्या जातीय,धार्मिक,मुद्दे,सवंग योजनांना मतदारांनी नाकारले आहे.इतकेच नव्हे,आदिवासी व दलित समाजाने विकास या मुद्दावर भाजपाला साथ दिली आहे.कॉंग्रेसला मत देणे पसंत केले नाही.या निवडणुकीचा भाजपाच्या विजयाचा आवाज २०२४ निवडणुकीपर्यंत घुमूत राहणार आहे.आता भाजपाच्या हातात १७ राज्यात सत्ता आलेली आहे. भाजपाच्या मताची टक्केवारी वाढत चालली आहे. तसेच या निवडणुकीने देशातील २०२४ च्या भाजपाच्या विजयाच्या 'हॅटट्रिक' ची ग्यारंटी दिली आहे.दुसरीकडे मोदींना पराभूत करण्यासाठी विरोधी पक्षांनी इंडीया आघाडीची जी मोळी बांधली.पण ही मजबूत होण्याऐवजी अधिक कमजोर होत आहे. यात मोदीची कबर खोदण्याचे मनसुबे विरोधकांनी रचले, होते पण या निवडणुकीत कॉंग्रेस नेते गांधी यांनी मोदी यांना पनौती व खिसेकापू नीच शब्दाचा वापर केला,तसेच सनातन धर्म संपविण्याचा भाषा केली गेली.पण धर्मनिरपेक्ष असलेल्या कॉंग्रेसने मौन पाळले? सनातन धर्माचा शाप कॉंग्रेसला लागला आहे,असे कॉंग्रेस नेते आचार्य प्रमोद कृष्णन यांनी प्रतिक्रिया दिली.यात चूक नाही.२०१४ पासून कॉंग्रेसची भूमिका हिंदू विरोधी वाढत चालली आहे. त्याचा हा परिणाम आहे.यावर कॉंग्रेस आत्मचिंतन करण्यास तयार नाही.कॉंग्रेस पक्षाची हिंदू धर्म विरोधी मानसिकता आता उघड झाली आली.कॉंग्रेस पक्षाने राज्यातील सत्तेच्या मोहापायी इंडिया आघाडीसाठी कबर खोदली आहे.त्यामुळे २०२४ मध्ये भाजपा मोदी नेतृत्वाला पराभव करणे, हे इंडिया आघाडीसमोर आव्हान आहे.

# लोहा नगर परिषदेतील अनागोंदी कारभार व भ्रष्टाचाराची चौकशी करा

## पलिकेसमोर पाचव्या दिवशीही उपोषण सुरूच; उपोषणकर्त्याची प्रकृती खालावली

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** बहुचर्चित असलेल्या लोहा नगरपरिषदेचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मागील पाच वर्षांच्या कार्यकाळात लोकनियुक्त नगराध्यक्ष यांनी एकाधिकारशाहीचा अवलंब करत मनमानीपणे प्रचंड प्रमाणात अनागोंदी कारभार करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टचार केला असून सदरील गैरकारभाराची सखोल चौकशी करून दोषीवर कार्यवाही करण्यात यावी या मागणीसाठी मागील पाच दिवसांपासून लोहा पालिकेसमोर सामाजिक कार्यकर्ते मारोती व्यंकटी शेळके यांनी तंबू टाकून उपोषण सुरू केले आहे. पाचव्या दिवशीही उपोषण सुरू होते. त्यांची प्रकृती खालावली आहे.

मागील पाच वर्षात लोहा नगर परिषदेच्या हद्दीत झालेल्या विविध विकास कामात अनियमितता झाली असून नगराध्यक्षांनी स्वतःच्या मर्जीतील कांहीं कर्मचाऱ्यांना हाताशी धरून पात्रता नसतानाही त्यांच्याकडे कार्यालयातील महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली असल्याचे तक्रारदाराच्या माहितीतून समोर आले आहे. तसेच पालिकेकडून शहरात बेकायदेशीरपणे अव्वाच्या सव्वा गुंठेवारी शुल्क आकारत जवळपास चार कोटी रक्कम वसूल केली. प्लॉट धारकांना रक्कमेच्या पावत्या देण्यात आल्या नाहीत, गुंठेवारीच्या तारखा ह्या मागील तारखेत करण्यासाठी शेळके यांना २० हजार रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न केला. त्यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे. शहरातील पाणीपुरवठा कामासाठी



दाखविण्यात आल्या आहेत. तसेच सदरील रक्कम पालिकेने स्वतंत्र बँक खाते काढून भरणा केली नाही. सन २०१९ मध्ये रस्त्यावरील सोलार विद्युत खांबासाठी लोहा पालीकेला जवळपास ५ कोटी निधी शासनाकडून प्राप्त झाला होता. त्यातही अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. तसेच लोहा पालिकेतील कार्यालयात लिपिक पदावर असलेल्या उल्हास राठोड यास नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती देण्यात आली. या संदर्भात माहिती अधिकारात अपील न ब्लिचिंग पावडर आणि तुरटी खरेदीमध्ये भ्रष्टाचार करण्यात आला आहे. घणकचरा व्यवस्थापनासाठी नगराध्यक्षांनी एका नगरसेवक प्रतिनिधीला हाताशी धरून १९ लाख रुपयांचे टेंडर मंजूर केले. सदर गुत्तेदार याने ठरवून दिलेल्या अटी शर्तीची पायमल्ली करून बोगस कागदपत्र व्यवहार आधारे भ्रष्टाचार केला. त्यातून शासनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पालिका हद्दीत ७५ हजार वृक्ष लागवड करण्याचे टेंडर काढून एकही झाड न लावता भ्रष्टाचार केला आहे. शहरात घरकुल कामातही मोठा घोटाळा करण्यात आला आहे. घरकुल योजनेतील लाभार्थी निवडीसाठी तसेच निवड झालेल्या लाभार्थ्यांकडून घरकुल बांधकाम परवानगीसाठी खास पालिका कर्मचाऱ्यामार्फत व ठराविक दलाला मार्फत माया गोळा केली असून ज्यांच्याकडे पक्के व मजबुत घरे आहेत अशाना लाभार्थी भासवून घरकुल योजनेचा लाभ देवून शासनाची फसवणूक केली. श्री विठ्ठलेश्वर देवस्थान समितीची सर्व्हे नंबर ४९ मध्ये जवळपास चारशे ते पाचशे घरं अतिक्रमित उभी राहिली आहेत. प्रति घर मालकाकडून बेकायदेशीर रित्या रिव्हजन च्या नावाखाली १५ ते २० हजार रुपये घेतले आहेत. सदरील बोगस वसाहतीत बेकायदेशीररीत्या रस्ते व नाली बांधकामांसाठी कोट्यवधी रुपये मंजूर करून भ्रष्टचार केला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून वरील सर्व बोगस, अनियमितता, भ्रष्टाचार व गैरकारभाराची सखोल चौकशी करून दोषी विरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मारोती व्यंकटी शेळके हे दि. २९ नोव्हेंबर रोजी आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांची प्रकृती खालावली असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# चक्रीवादळाचा रेल्वेला फटका

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** आंध्र प्रदेश येथील चक्रीवादळ 'मिचौंग'चा रेल्वेला देखील फटका बसत आहे. खबरदारीचा उपाय म्हणून रेल्वे प्रशासनकडून काही प्रवासी रेल्वे गाडी रद्द करण्यात येत आहे. यामध्ये भुसावळ विभागातील नवजीवन एक्सप्रेस रेल्वेगाडीचा समावेश आहे.

तीन दिवस नवजीवन एक्सप्रेस धावणार नाही. आंध्र प्रदेशमध्ये चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर खबरदारी घेतली जात आहे. रेल्वेने अनेक प्रवासी गाड्यांच्या फेऱ्या रद्द केल्या आहेत. यामध्ये भुसावळ विभागातून धावणारी नवजीवन एक्सप्रेसचा देखील समावेश आहे. गाडी क्रमांक १२६५६ चेन्नई – अहमदाबाद नवजीवन एक्सप्रेस ०३ ते ०५ डिसेंबरपर्यंत रद्द करण्यात आली आहे. गाडी क्रमांक १२६५५ अहमदाबाद – चेन्नई नवजीवन एक्सप्रेस ०४ ते ०६ डिसेंबरपर्यंत रद्द करण्यात आली आहे. या गाडीच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची ऐनवेळी चांगलीच अडचण होणार आहे.



# आरक्षण घेतल्याशिवाय एक इंचही मागे हटणार नाही

## मनोज जरांगे पाटील : फक्त एकजूट ठेवा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे शनिवारी गिरणी मैदानावर मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या सभेचे आयोजन सकल मराठा समाजाकडून करण्यात आले होते. सायंकाळ सात वाज्याची सभा थेट रात्री पाऊणे बारा वाजता सुरू झाली, तरीही या सभेला महिलां, पुरूष, युवक, युवती यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती. या मैदानावरील ही सर्वात मोठी रेकॉर्डब्रेक सभा झाली. सत्तर वर्षापासून मराठा समाजाच्या राज्यकर्त्यांनी वाटोळे केले आहे. प्रत्येक पक्षातील नेते मोठे केले, मात्र आज आपल्या हक्काचे आरक्षण मागतोय तर एकही नेता आपल्या बाजूने बोलायला तयार नाही. त्यांच्या सभेचे पोस्टर आपल्या लेकारांनी



चिटकविले मात्र त्याच नेत्यांचा भैय्यासाहेब आज आपल्या सभेचे पोस्टर चिटकवतो का?.. आज आमची लेकरं आरक्षण मिळत नाही, म्हणून मरायला लागली आहेत. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत मराठा समाजाने जातीपेक्षा कोणत्याही पक्षाच्या नेत्याला मोठे समजू नये, त्यांच्या कार्यक्रमालाही जाऊ नये असे आवाहन मनोज जरांगे-पाटील यांनी उपस्थितीत समाज बांधवांना केले. मराठा समाजाने मतभेद विसरून आपण एकजुटीने लढा, शांततेत आंदोलन करा. उद्रेक, जाळपोळ कोणी करू नका. ओबीसी बांधवांच्या अंगावर जायचं नाही. त्यांनीही अंगावर यायचं नाही. गावागावांत साखळी उपोषण सुरू करा. २४ डिसेंबरपर्यंत सावध राहा, असे आवाहन जरांगेंनी यांनी केले आहे. महाराष्ट्रात 32 लाख मराठ्यांच्या नोंदी सापडल्यात आता तो अहवाल स्वीकारून महाराष्ट्रातल्या मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी कायदा पारित करावा, मी पणाचा आकस ठेवून जातीय तेढ निर्माण होईल,असे बोलु नाही. तरीही मला विरोधक आणि सरकारने मला शत्रू मानले. मी मरायला घाबरत नाही. फक्त तुम्ही एकजूट ठेवा, आरक्षण घेतल्याशिवाय सरकारला सुटी नाही, आरक्षण घेतल्याशिवाय एक इंच ही हटनार नाही असेही जरांगे बोलतांनी म्हणाले. सभेसाठी हजारो मराठा समाज बांधव शनिवारी पाच वाजेपासून गिरणी ग्राउंडवर येऊन बसले होते. त्यांना स्वयंमसेवकांकडून पार्कींग व्यवस्था ,पाण्याच्या बॉटल, नाश्त्याची पाकिटे पुरवल्याने सभेची उत्तम सोय केल्याने स्वयंमसेवकांची तालुक्याभरात कौतुक होत आहे.



# संत निरंकारी आध्यात्मिक मिशन नवीन शेवा येथे केंद्राचा व हॉलचा उद्घाटन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या असीम कृपाशीर्वादाने उरण सिटी बॅच मध्ये नवीन सत्संग व हॉलचा उद्घाटन रविवार दिनांक ३ डिसेंबर २०२३ रोजी नवीन शेवा येथे संपन्न झाले, यावेळी सत्संगाचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते, सदर कार्यक्रमास परम.आ.अनिल चव्हाण ज्ञानपरस प्रचारक, ऐरोली सत्संग प्रमुख अशोक केरेकर व समीर पाटील यांची विशेष उपस्थिती होती तर उरण चे माजी आमदार चे मनोहरशेठ भोईर यांची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी निरंकारी मिशनचे सेक्टर संयोजक दता पाटील यांच्या हस्ते माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच प्रत्येक रविवारी सत्संग संध्याकाळी ६ ते ८ ह्या वेळेस असणार आहे, तरी सर्वांनी सत्संग चा लाभ घ्यावा, आशी सत्संग केंद्रप्रमुखांकडून विनंती करण्यात आली आहे.सदर कार्यक्रम प्रसंगी नवीन शेवा सरपंच सोनल घरत, गावचे अध्यक्ष कमलाकर पाटील, संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, कामगार नेते गणेश घरत, ग्रामपंचायत सदस्य वैशाली म्हात्रे, शाखा संघटिका वैशाली सुतार, सुरेखा भोईर, शुभांगी भोईर, प्रमुख कार्यकर्ते शेखर पडते, परशुराम ठाकूर, परशुराम म्हात्रे, सत्संग भक्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनचा प्रचार व प्रसिद्धी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सुपीक जमीन ही निसर्गाची देणगी असून तिची योग्य काळजी घेतल्यास ती एक चिरकाल ठेवा आहे. म्हणून विषमुक्त अन्न, प्रदुर्षण विरहीत जमीन व पाणी एकूणच शाश्वत कृषी उत्पादनासाठी नैसर्गिक/सेंद्रिय शेती हा पर्याय आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यात नैसर्गिक/सेंद्रिय शेतीसाठी अभियान राबविणे आवश्यक आहे. यादृष्टीने राज्यात नैसर्गिक/सेंद्रिय आहेतीला प्रोत्साहन देणेकरीता डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन योजनेला शासनाने मान्यता दिलेली आहे. सदरील योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार सोयगाव तालुक्यात दहा गावांची निवड करून एकूण ५०० हे. निवड करावयाचे आहे यात प्रामुख्याने शिदोळ, मुखेड, बनोटीतांडा, गलवाडा(ब), घोरकुंड, रवळा, वरखेडी खु, निंबायती,वेताळवाडी व नांदागाव या गावांची निवड करण्यात आलेली असून आज रोजी शिदोळ येथे बैठक घेऊन ५० लाभार्थी यांची निवड करण्यात आली. सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी ५० हेक्टर क्षेत्राचा एक गट तयार करावयाचा आहे. सदरच्या योजनेचे लाभार्थी निवड करताना आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड, बँक पासबुक, सात बारा व ८ अ यांची गरज असल्याचे आजच्या बैठकीत सांगण्यात आले.

आजच्या बैठकीत योजनेची माहिती अमोल महाजन बी.टी. एम.सोयगाव यांनी दिली. आजच्या कार्यक्रमात पिक विमा योजनेबद्दलची माहिती जगदीश सोनवणे (पिक विमा प्रतिनिधी) यांनी दिली. आजच्या कार्यक्रमात गावातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, प्रगतीशील शेतकरी यांची उपस्थिती होती.

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाळापूर :** उपनगरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास वाढला आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण, लहान बालके यांच्यावर भटक्या कुत्र्यांचे हल्ला करण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक वेळा ही भटकी कुत्री रस्त्यावर फिरतात. रात्री कुत्री अंगावर आल्याने दुचाकीस्वार गाडी जोरात पळवितात आणि अपघात होतात. प्रमुख रस्ते, चौक, सार्वजनिक ठिकाणे अंतर्गत गल्यांमधून मोकाट कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला असून, मनपा प्रशासनाने त्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

बाळापूर गावात मोकाट कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. या मोकाट कुत्र्यांमुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांसह पादचारी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त महापालिकेने करण्याची गरज आहे. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात यावी. अशी मागणी ही बाळापूर येथील नागरिकांनी केली आहे. मोकाट कुत्र्यांमुळे एखादी दुर्घटना होण्यापूर्वीच संबंधित यंत्रणेने यां कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा तीव्र स्वरूपाच आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ही गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे.

याप्रसंगी दत्तू पाटील, पत्रकार दिपक वाघ, सामाजिक कार्यकर्ते माधवराव पाटील, किरण मराठे, भैय्या मराठे, महेंद्र महाले, संदीप पाटील, भटू पाटील यांसह आदी नागरिक यावेळी उपस्थित होते.

# प्राण वाचविल्याबद्दल सीआरपी सद्दाम पटेलचे गावकऱ्यांकडून कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे बोडखा येथील श्री सद्दाम दस्तगीर पटेल यांनी नुकतेच राज्य राखीव पोलीस बल (गट क्रमांक १४) छत्रपती संभाजीनगर येथून महाराष्ट्र सुरक्षा महामंडळ(M.S.F.) यांचे ४५ दिवसांचे मूलभूत प्रशिक्षण प्राप्त केले आहे. सदर प्रशिक्षण घेऊन तो तरुण आपल्या गावी आला असता, दिनांक 3 डिसेंबर 2023 रोजी बोडखा गावातील व्यक्ती दामोदर सुपडू दानकर हे आपल्या सलूनच्या दुकानावर ग्राहकाची हजामत करीत असता अचानक चक्कर येऊन पडले. त्यांना मोठ्या प्रमाणात श्वास घेण्यात त्रास होऊ लागल्याने ते जमिनीवर लोळत होते. हे पाहून तेथे मोठ्या प्रमाणात गावकरी एकत्र जमले. त्यात सद्दाम दस्तगीर पटेल हा ही तेथे आला. त्याने सदर व्यक्तीला प्रशिक्षणात शिकवलेल्या पद्धतीनेC.P.R. दिला त्याचा परिणाम म्हणून ती व्यक्ती त्वरित शुद्धीवर येऊन उठून बसली व सुरळीत श्वास घेऊ लागली. त्यानंतर त्यांना त्यांना कुटुंबीयांसह पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरला रवाना केले. श्री सद्दाम दस्तगीर पटेल यांच्या तत्परतेने व प्रशिक्षणामुळे एका व्यक्तीस जीवनदान मिळाल्याने सर्वांना मोठे कौतुक वाटले. दिनांक ४.१२-२०२३ रोजी ग्रामपंचायतच्या वतीने श्री सद्दाम दस्तगीर पटेल यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोडखा गावचे पोलीस पाटील श्री रायभान यादवराव सोनवणे पाटील ग्रामपंचायत सदस्य श्री जाकीर इमाम शहा, प्रकाश जाधव, अरुण गायकवाड,रफीक पटेल, चेअरमन काकासाहेब लोंढे तंटामुक्ती अध्यक्ष आरफत वजीर शहा, गजानन पाडसवान, योगेश भोकरे, सौरभ दानकर, श्री रतन बनसोडे, बाळू बनसोडे, फकीरराव लोंढे, भागिनाथ लोंढे, विठ्ठल खंबाट, संतोष फाटे, हबीब शहा, शाहरुख शहा व इतर गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते सदर वार्ता महाराष्ट्र सुरक्षा महामंडळास कळाल्यावर प्रशिक्षक अधिकारी श्री प्रशांत गायकवाड,अनंत ढगे, अनिल भुजंगे, सचिन जीवडे, व श्री बोडखे, या सर्वांनी आपल्या प्रशिक्षित जवानाचे अभिनंदन कौतुक केले.






# जागतिक अपंग दिनानिमित्त अपंग बांधवांना ग्रामपंचायतकडून मिळणार विमा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** जागतिक अपंग दिनानिमित्त अपंग बांधवांना ग्रामपंचायत कडून वीमा, मिळणार, तर करात पन्नास टक्के सवलत मिळणार आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने अपंग बांधवांसाठी जागतिक अपंग दिनानिमित्त भेट देण्यात आली आहे.

फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक अपंग दिननिमित्त वडोद बाजार येथील अपंग बांधवांचा सत्कार करण्यात आला. वडोद बाजार ग्रामपंचायत अंतर्गत 80 अपंग बांधव असून

जागतिक अपंग दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत वडोद बाजार यांच्या वतीने सर्व अपंगांचा सत्कार करून ग्रामपंचायत च्या वतीने त्यांना काही सवलती देण्यात आल्या त्यामध्ये ग्रामपंचायत करांमधूनग्रामपंचायत करा मधून 50% सूट देण्यात येणार आहे,तर सर्व अपंगांचा विमा काढन्यात येणार आहे अशा सवलती देऊन त्यांना अपंग दिनाची भेट देऊन सन्मान करण्यात आला. ग्रापंचायतचे सरपंच पाकिजा पठाण, उपसरपंच गोपाळ वाघ, ग्रामपंचायत सदस्य शेख राजिक साबेर पठाण,गोविंद पाडेजी, ग्रामविकास अधिकारी रामदास पात्रे, शामराव दुधे, अशोक शिंगारे ,बाबुराव मंदाडे , राजू मस्के अशोक शिंगारे अरुण स, फकिरा मिस्तरी, भागाची टिकटे,विठ्ठल ब्राह्मणे, ज्ञानेश्वर खाकरे, दीपक राऊतरामू खाकरे, आदी सह अपंग महिला भगिनी व बांधव यावेळी उपस्थित होते,ग्रामपंचायतीच्या वतीने सर्व अपंगांचा सत्कार करण्यात आला.

# नामांकित कंपनीचे बनावट छापे वापरणारा आरोपी व लाखोंचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** स्टिल क्षेत्रातील नावलौकीक असणाऱ्या जिंदाल कंपनीचे नावाचा वापर करुन ग्राहकांची फसवणुक करणारा इसम 24 लाख 32 हजार कि मुद्देमाल सहित आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात दि. ०३रोजी पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय शिंदे, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी प्राप्त झाली की, चाळीसगाव रोड पोलीस ठाणे हथीतील १०० फुटी रोड येथील स्मार्ट स्टिल या दुकानामध्ये सिलींगसाठी लागणारे साहीत्य विक्रीसाठी असुन त्या साहीत्यापैकी साधारण स्टिल दर्जा असलेल्या पत्राचा वापर करुन स्टिल क्षेत्रात नावलौकीक असणाऱ्या जिंदाल कंपनीचे छापील नाव वापरुन सिलीग करिता उपयोगी असणाऱ्या स्टिल पट्यावर JINDAL असे नाव छापून ठकबाजी करुन ग्राहकांची फसवणूक करीत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने मा. पो. निरी. श्री. दत्तात्रय शिंदे यांनी नमुद बातमीची खात्री करुन पुढील कारवाई करणे बाबत स्थागुशा येथील पथकास आदेशीत केले होते त्याअनुषंगाने पथकाने चाळीसगाव रोड पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांचे मदतीने १०० फुटी रोड येथील स्मार्ट स्टिल दुकानात छापा टाकला असता, एक इसम मिळून आल्याने त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव मुखतार खान शहजाद खान व्यवसाय पीओपी मटेरीयल विक्री, स्मार्ट स्टिल दुकान, १०० फुटी रोड थुळे रा. प्लॉट नं. ८५, गरीब नवाज नगर, सार्वजनिक हॉस्पीटल जवळ, धुळे असे सांगितले. सदर दुकानाची पाहणी करता, एका मशिनव्दारे साधारण पत्रावर सिलींग पटटीचा आकार देवुन त्यावर निलकमल कंपनीच्या प्रिंटरने JINDAL अश्या नावाची छपाई होवुन कटीग होत असल्याचे दिसून आल्याने मुखतार खान यास JINDAL नावाचे छपाईचे परवाना बाबत विचारपुस केली असता, त्याने त्याबाबतचा परवाना नसल्याचे सांगितले. तसेच JINDAL नावाचे छपाईचे कारणा बाबत विचारपुस केली असता, JINDAL या कंपनीचा स्टिल क्षेत्रात नावलौकीक असल्याने सदर नावाने सिलींग पटयांची विक्री जास्त प्रमाणात होत असल्याने निलकमल प्रिंटरच्या सहायाने छपाई करीत असल्याचे सांगितले, त्यावरुन मुखतार खान शहजाद खान याने ग्राहकांची फसवणुक करीत असल्याचे दिसुन आल्याने त्याचे मालकीचे स्मार्ट स्टिल दुकानातुन २४,३२,५००/- रु. किमतीचा व वर्णनाचा साधारण स्टिल दर्जा असलेल्या पत्राचा वापर करुन स्टिल क्षेत्रात नावलौकीक असणा-या जिंदाल कंपनीचे छापील नाव वापरुन सिलींग करिता उपयोगी असणा-या स्टिल पटटयावर JINDAL असे नाव छापुन ठकबाजी करुन ग्राहकांची फसवणुक करण्याकरीता उपयोगा येणारे साहीत्य मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करुन मुखतार खान शहजाद खान याचे विरुध्द चाळीसगाव रोड पोलीस ठाणे भादंवि कलम ४१९, ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, धुळे श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय शिंदे, स्था.गु.शा., धुळे, पोलीस निरीक्षक श्री. धिरज महाजन, चाळीसगाव रोड पो.स्टे., स्थागुशा येथील बाळासाहेब सुर्यवंशी, अमरजित मोरे, मच्छिद्र पाटील, संदीप सरग,शोएब बेग,राजु गिते अशांनी केली आहे.

# पालकांनी मुलां-मुलींना मोबाईलपासून दूर ठेवावे

पालकांनी मुलां-मुलींना मोबाईल व टीव्हीपासून दूर ठेवावे

**वैजापूर :** वाचाल तर वाचाल हे सुभाषित पायदळी तुडवून आज मुलं-मुली मोबाईल व टी.व्ही. संस्कृती "पाहाल तर जगाल"असे समजुन वाचन सोडून सर्रास मोबाईल व टी, व्ही पाहण्यात गुंग आहेत. यामुळे ते आपल्या करिअर पासून दूर व खूप दूर जात आहेत हे वेळीच थांबविण्यासाठी पालकांनी मुलां-मुलींना मोबाईल व टी. व्ही. पासून दूर ठेवण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन मराठवाड्याचे जेष्ठ बालसाहित्यक व वृत्तपत्र स्तंभ लेख धोंडीरामसिंह राजपूत यांनी गंगापूर येथील मुक्तानंद महाविद्यालयात आयोजित ४३ व्या मराठवाडा साहित्य संमेलनातील बालमेळाव्यातील कथाकथन कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलताना केले ते पुढे म्हणाले की, बालकथा लेखक व कवी यांनीही आपले लेखन नैतिक, सामाजिक, राष्ट्रीय, पर्यावरण पूरक व कौटुंबिक मूल्यांना धरून मुलं -मुली वाचून अनुकरण करतील, असे लेखन करण्यावर भर द्यावा असेही राजपूत पुढे म्हणाले. त्यांनी एक मूल्य कथा सादर केली या कथाकथनात मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील बालकथाकारानी भाग घेतला यात त्र्यंबक वडस्कर, गेनू शिंदे, धनंजय गुडसुरकर, अलका सपकाळ, प्रकाश जाधव, विशाल तायडे, संजय येरवाड, यांनी आपल्या दर्जेदार कथा सादर करून उपस्थितांची मन जिंकली सूत्र संचलन रविराज काळे यांनी केले. आभार श्रीमती पालोदकर व संदीप गायके यांनी मानले.



# विदर्भावर पुन्हा अवकाळी पावसाचे संकट

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** विदर्भात अवकाळी पावसाचे सत्र कायम असून त्याचा मोठा परिणाम शेतीवर होत आहे. डिसेंबर उजाडला तरी पाऊस पाठ सोडायला तयार नाही. हे संकट कायम असून हवामान खात्यानेही विदर्भाबाबत गंभीर इशारा दिला आहे. अरबी समुद्रासह बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात अवकाळी पावसाचे सत्र सुरू झाले आहे. आता आणखी एक चक्रीवादळ घोंगावत असून राज्यातील वातावरणावर त्याचा परिणाम होताना दिसून येत आहे. येत्या २४ तासात विदर्भाला पुन्हा एकदा अवकाळीचा तडाखा बसू शकतो, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. विदर्भात गुलाबी थंडीला सुरुवात झाली असताना अवकाळी पावसामुळे त्यात पुन्हा खंड पडला आहे. अल निनोच्या प्रभावामुळे यंदा मोसमी पाऊस म्हणावा तसा पडला नाही आणि आता डिसेंबर उजाडूनही थंडी पडायला तयार नाही, त्यामुळे हिवाळ्याची चाहूल यंदा जाणवली नाही. भारतीय हवामान खात्याने सुद्धा यंदा थंडी जाणवणार नाही असे सांगितले आहे.



# मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या शुभहस्ते पुतळ्याचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज


**कन्नड :** शहरातील श्री स्वामी समर्थ बहुउदेशिय शिक्षण संस्थेच्या महाराजा सयाजीराव गायकवाड व कै झेलूबाई शंकरराव पाटील गायकवाड विद्यालय कन्नड येथे हिंदवी स्वराज्य संस्थापक रयतेचा जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज व बडोदा संस्थांनाचे सार्वभौम राजे महाराजा सयाजीराव गायकवाड या दोन स्मारकांचे लोकार्पण मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या शुभहस्ते पार पडला, याप्रसंगी जरांगे पाटील यांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष गणपतराव गायकवाड यांनी केले तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव आढाव ,सचिव उदयसिहं गायकवाड, कोषाअध्यक्ष अभयसिहं गायकवाड,माजी सभापती इंदुमती गायकवाड, संतोष आढाव, संदीप आढाव स्वाती उदयसिहं गायकवाड आश्विनी अभयसिहं गायकवाड, युवराज गायकवाड, राजविरसिहं गायकवाड, मुख्याध्यापक प्रमोद गायकवाड ,उद्धव पवार ,विलास इंगळे, राजू सपकाळ., दीपक कुमावत इत्यादींची उपस्थीती होती .

# ओम, सोहम यांची नेपाळमध्ये भारतीय सब-ज्युनियर फुटबॉल संघात निवड

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** दक्षिण फुटबॉल स्पर्धेकरिता भारतीय संघात महाराष्ट्र राज्यातीलखेळाडूं व प्रशिक्षकांची निवड झाली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजी नगर येथील युनिव्हर्सल हायस्कूल शाळेचे ओम खंडेलवाल व सोहम खंडेलवाल यांची 14 वर्षाखालीलसबज्युनियर भारतीय फुटबॉल संघात निवड झाली आहे. तसेच भारतीय सबज्युनियर फुटबॉल संघाचे प्रशिक्षक म्हणून डी.आर. खैरनार यांची तर भारतीय ज्यूनियर फुटबॉल संघाचे प्रशिक्षक शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त प्रा. एकनाथ साळुंके यांची निवड झाली आहे. ओम खंडेलवाल व सोहम खंडेलवाल हे युनिव्हर्सल शाळेत इयत्ता सातवी मध्ये शिक्षण घेत आहेत. अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही मिळवलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल, युनिव्हर्सल हायस्कूलचे अध्यक्ष माननीय श्री. जीसस लाल, प्राचार्या कु. सीमा गुप्ता, उपप्राचार्य श्री. ब्रह्मपुरीकर यांनी ओम आणि सोहम यांचे विशेष कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या निवडी बद्दल नाईन ए साईड हौशी फुटबॉल स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र पवार राष्ट्रीय सहसचिव प्रा.एकनाथ साळुंके, राष्ट्रीय महासचिव प्रवीण सांगते, राज्य सहसचिव प्रा. संतोष खेंडे, सय्यद शकील, हरीश सातपती,अभय बिराज, नागेश वराडे जालना सरकार सर, प्रकाश तुमाने ,बद्रुद्दीन सिद्दिकी, प्राचार्य राज खंडेलवाल, सतीश पवार,अक्तर कुरेशी, जुनेद खान, रहीम खान,राहूल बनसोडे, लाईक खान, प्रा. राकेश खैरनार, शेख निसार, पांडुरंग कदम, बाजीराव भूतेकर, डॉ.रणजीत पवार, वैभव किरगत , गणेश बेटूदे, गोकुळ तांदळे, पंकज भारसाकळे,सागर तांबे,यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. ओम आणि सोहमच्या घवघवीत यशाबद्दल जालना जिल्ह्याच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मा.रामेश्वर खनाळ, उपनिरीक्षक श्री आशिष खांडेकर,श्री विकास गाडेकर, श्री वैभव खनाळ,डॉ. श्री दीपक गावडे, डॉ .श्री रवी साखरे,श्री विशाल खनाळ, श्री श्रेयस गाडेकर, सौ. अर्चना गाडेकर, डॉ. दिपाली गावडे, डॉ.स्विनल खनाळ, डॉ.दिविजा गावडे, श्रीमती गंगा गाडेकर, श्रीमती लता साखरे, श्री आजिनाथ गाडेकर,श्री महेश गाडेकर, श्री वामन पाडवे, श्री सचिन पाडवे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत..

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# डॉ. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने गायकवाड दांपत्याचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य कामगार विमा योजनेचे स्टेट नोडल अधिकारी डॉ. संजय माधवराव गायकवाड मुखेडकर यांनी कोरोना काळामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकांसाठी प्रशंसनीय कार्य केले त्याबद्दल तसेच त्यांच्या पत्नी कल्पना संजय गायकवाड यांना अवयव दानावर आधारीत पहिलाच मराठी चित्रपट तुझ्यासाठी काहीही हा ऑस्कर पुरस्कार 2023 साठी 5 विभागामध्ये पात्र ठरल्याबद्दल 3 डिसेंबर 2023 रोजी दिल्लीत डॉ. बी. आर.आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

यापूर्वी डॉ.संजय गायकवाड यांना आंतरराष्ट्रीय आशिया पॅसिफिक पुरस्कार 2023 , राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार, इंदोर , मध्य प्रदेश, राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार 2023 ,नाशिक , राष्ट्रीय नेताजी सुभाषचंद्र बोस पुरस्कार 2023




, कोलकत्ता, राष्ट्रीय कृषी पुरस्कार 2023, नाशिक , राष्ट्रीय आयडॉल 2023 पुरस्कार , नाशिक, नवी दिल्ली एक्सेल्लेन्स अवॉर्ड 2023 , मराठवाडा भूषण पुरस्कार 2023 मिळाले आहेत. तर कल्पना संजय गायकवाड मुखेडकर यांनी निर्माण केलेला अवयव दानावर आधारीत पहिलाच मराठी चित्रपट तुझ्यासाठी काहीही हा ऑस्कर पुरस्कार 2023 साठी 5 विभागामध्ये पात्र ठरला आहे. कल्पना गायकवाड यांना आतापर्यंत राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार 2023 ,इंदोर, मध्यप्रदेश, राष्ट्रीय बंग गौरव पुरस्कार 2023, कोलकत्ता, राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार 2023, नाशिक, नवी दिल्ली एक्सेलेन्स अवॉर्ड 2023 , सावित्रीच्या लेकी पुरस्कार 2023, नवी दिल्ली, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज भूषण पुरस्कार 2023, मुंबई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कार 2023, मुंबई , मिळाले आहेत.या कार्यक्रमासाठी देशभरातील अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल डॉ. संजय गायकवाड मुखेडकर व कल्पना संजय गायकवाड मुखेडकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# युगप्रवर्तक राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारासाठी पुस्तके पाठविण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** युगप्रवर्तक राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारासाठी कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबरी, ललित गद्य, बालसाहित्य, संकीर्ण चरित्र,आत्मचरित्र,समीक्षा,लोकसाहित्य ई.साहित्यप्रकारातील पुस्तकांना युगप्रवर्तक साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे,तरी साहित्यिकांनी 1 जाने 22 ते डिसेंबर 22 व 1 जाने 23 ते डिसेंबर 2023 या दोन वर्षात प्रकाशित झालेल्या साहित्यकृतीच्या 2 प्रती पुरस्कारासाठी पाठवाव्यात असे आवाहन मुख्य संयोजक डी.के.शेख यांनी केले आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम,स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असून पुस्तके 2 प्रतीत रजिस्टर पोस्टानेच पाठवावीत.पुस्तकावर काहीही लिहू नये, स्वतंत्र कागदावर पत्र लिहावे,सोबत परिचय द्यावा.मागील वर्षातील ( 2022 )पुस्तके पाठवताना कोणताही पुरस्कार न मिळालेली पुस्तके पाठवावीत. पुस्तके



डी. के. शेख ,गल्ली नं 9, शम्स चौक, खाजा नगर धाराशिव - 413501 मो- 9552843365, 8999860901 येथे पाठवावीत असे आवाहन डी.के.शेख यांनी केले.

# मराठा आरक्षणासाठी तरुणाने घेतला गळफास

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील चिंचोली नकीब येथील २७ वर्षीय तरुणाने मराठा आरक्षणासाठी चिठ्ठी लिहून शेतातील राहत्या घरात शुक्रवारी गणेश जंगले रात्री गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. गणेश काकासाहेब जंगले असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. हा मराठा आरक्षणासाठीच्या विविध आंदोलनात सक्रिय होता. शुक्रवारी रात्री जेवण केल्यानंतर झोपण्याच्या निमित्ताने शेतात असलेल्या घरातील खोलीत गेला. शनिवारी सकाळी लवकर न उठल्याने आई-वडिलांनी दरवाजा उघडण्यासाठी आवाज दिला. परंतु, आतून काहीच प्रतिसाद मिळत नसल्याने शेजारील शेतकरी जमा झाले. गणेशने गळफास घेतल्याचे दिसून येताच पिशोर पोलिसांना घटनेची माहिती दिली असता पोलिसांनी येऊन मृतदेह खाली उतरवला. या वेळी त्याच्या खिशात मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने मी आत्महत्या करत असल्याची चिठ्ठी सापडली.

# ११२६ हेक्टर सरकारी जमिनीवर अतिक्रमण

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यात शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून घरे बांधणाऱ्यांचे जिल्हा प्रशासनाकडून सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणानुसार गोंदिया जिल्ह्यातील एकूण १,१२६.६६ हेक्टर आर. जमिनीवर अतिक्रमण करून २० हजार घरे बांधली आहेत. त्यापैकी सर्वाधिक अर्जुनी मोरगाव तालुक्यात आहे.९३२.१४ हेक्टर आर. जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील १,१२६ .६६ हेक्टर आर. भूमिहीन गरजू अतिक्रमण केलेल्या गायरान सरकारी जमिनीवर अनेक वर्षांपासून घरे बांधून राहत आहेत. मात्र शासनाकडून त्यांना कायमस्वरूपी जमिनीचे पट्टे दिले जात नाही. वर्षानुवर्षे अतिक्रमण करून घरे बांधणाऱ्या अशा अतिक्रमण धारकांच्या नावे जमिनीचे कायमस्वरूपी पट्टे देऊन त्यांना अतिक्रमणमुक्त करावे, अशी मागणी अतिक्रमणधारकांनी केली आहे. मात्र याकडे शासन व प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. येथे, प्रशासन अतिक्रमण धारकांकडून दरवर्षी एक लाख रुपयांचा दंड वसूल केला जातो. मात्र त्यांना कायमस्वरूपी पट्टे दिले जात नाहीत.स्थायी पट्टे देण्यात यावे अशी मागणी अतिक्रमणधारकांनी केली आहे. ही जमीन कायमस्वरूपी पट्टे देऊन अतिक्रमण पासून मुक्त व्हावी अशी ही अतिक्रमण धारकांची अपेक्षा आहे.




# जागतिक एड्स दिनानिमित्त राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव येथे जागतिक AIDS दिनानिमित्त राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय घोडेगाव येथे आज व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम मराठवाडा विकास संस्था ( औरंगाबाद ) आणि ग्रामीण रुग्णालय खुलताबाद यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. हा प्रोग्राम घेण्यासाठीचे नियोजन आणि मार्गदर्शन संस्थापक आप्पासाहेब उगले तसेच डी.आर. पी अन्नपूर्णा मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रमाचे नियाजन करण्यात आले. यावेळी उपस्थित व्यक्तीः- संध्या दिक्षित ( कांसलर ) सुरेखा सुरवसे, विशाल पडवळ, शुभांगी अधाने ( क्लस्टर लिंक वर्कर ) हे होते. संध्या दिक्षित मॅडम ( कांसलर ) व सुरेखा सुरवसे मॅडम यांनी मार्गदर्शन केले. यानंतर एचआयव्ही तपासणी घेण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशासकीय अधिकारी,प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# देश घडवणं ही संविधान अभ्यासकांची जबाबदारी : ॲड. आकाश आढाव

## साताऱ्यात संविधान परीक्षा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** आपला देश ज्या राज्यघटनेवर चालतो. ज्यामुळे या देशातील अनेक विविधता, परंपरा, वेगवेगळे धर्म, जाती, भाषा, सामाजिक, भौगोलिक परिस्थितीतही इंडिया दॅट इज भारत या नावाखाली एक कुटुंब म्हणून आपण बांधलो गेलो आहोत. त्या आपल्या भारत देशाच्या संविधानाचा अभ्यास प्रचार आणि प्रसार करणारे खऱ्या अर्थाने सुजाण नागरिक आहेत आणि आपल्या सर्वावरच ही जबाबदारी आहे की आपल्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रमाणात संविधान अभ्यासक घडून हे प्रमाण वाढत जावून एक आदर्श राष्ट्र म्हणून आपल्या देशाला जगभरात कायम गौरवलं जावं.असे प्रतिपादन लेखक आणि कायद्याचे अभ्यासक ॲड.आकाश आढाव यांनी केले.

संविधान दिनाचे औचित्य साधून रक्षित सामाजिक संस्था म्हसळे अंतर्गत संविधान गुणगौरव समितीच्या वतीने नूरखा पठाण लिखित आपले संविधान राज्यपद्धती नव्हे तर जीवनपद्धती या पुस्तकाच्या आधारे २ डिसेंबर रोजी राज्यभर संविधान गुणगौरव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.ही परीक्षा सातारा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात सुद्धा घेण्यात आली होती.या केंद्राचे केंद्र प्रमुख म्हणून ॲड.आकाश आढाव यांनी संविधान परीक्षा घेण्याची जबाबदारी पार पाडली.संविधान प्रति त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.यावेळी विष्णू मदने,पद्मश्री गंगावणे, सरिता माने तसेच सामाजिक कार्यकर्ते भोसले, धाईंजे, बनसोडे व तेथील सफाई व इतर कर्मचारी उपस्थित होते.परीक्षेच्या ठिकाणी परीक्षा सुरू करण्यापूर्वी संविधान उद्देशिकेचे वितरण करण्यात आले. ॲड.आढाव म्हणाले, इंडिया की भारत हा वादाचा प्रश्न नाही तर खरे प्रश्न लपविण्यासाठी लावलेला वाद आहे.आज फक्त शाळेमध्ये संविधानाची प्रास्ताविका वाचली म्हणजे झालं असं नाही तर देशातील सर्व नागरिकांना याची तोंड ओळख आपले अधिकार कर्तव्य आणि इतर संविधानिक गोष्टी तोंडपाठ असल्याच पाहिजेत आणि ज्यांना शक्य आहे.त्यांनी सगळ्यात आधी संविधानाचा अभ्यास करावा आणि तो फक्त आपल्यापुरता मर्यादित न ठेवता सतत समाजात जनजागृती करत राहिले पाहिजे. याचाच भाग म्हणून आपण अभ्यास करून परीक्षा द्यायला आला आहात. आपण संविधान साक्षर झाला आहात आता आपण अजून काही पटीने लोकांना साक्षर करत राहिले पाहिजे. याच तुम्हाला शुभेच्छा देतो. जी संस्था ही परीक्षा घेत आहे. त्या संस्थेचे आभार मानून या संस्थेचा विस्तार करण्यात आपणही कार्यरत राहू असे.गौरोद्‌गारही त्यांनी काढले परीक्षे संदर्भात परीक्षार्थी यांनी सुद्धा आपले अभिप्राय दिले. आपले अधिकार समजतात. हा उपक्रम अतिशय प्रेरणादायी आहे. देशामध्ये आज नागरिक फक्त शिक्षणामुळे सुशिक्षित असून चालत नाही.तर आपल्या हक्काचे संविधानिक रित्या कसा उपयोग करता येईल.याचीही जाणीव असायला हवी. जोपर्यंत प्रत्येक नागरिक संविधान हातात घेऊन स्वतः वाचत नाही,तोवर आपल्या या उपक्रमाची देशाला गरज आहे.असे सरिता माने यांनी म्हटले. या अभिप्राय बद्दल संविधान गुणगौरव समितीचे विलास पवार, नूरखा पठाण,सुशिल गायकवाड व इतर सदस्य आदींनी आभार मानलेले आहेत.



# दिव्यांगांना सर्व सहकार्य केलं जाईल : सुशिल भोसले

## दिव्यांगांना व्हीलचेअर भेट; पोलीस अधीक्षकांचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशील गायकवाड**

**लोणंद :** हल्ली वाढदिवस म्हटलं की, एक वेगळाच धुडगुस पाहायला मिळत असतो. थोबाडावर केक थापणे, डोक्यात अंडी फोडण्यापासून ते मोठ मोठ्या पार्ट्या केल्या जात असतात.परंतु अशा धुडगुस पासून कोसो दूर असणारी अनेक लोकं आपल्या अवती भवती असतात की ते स्वतःचा वाढदिवस हा सामाजिक बांधिलकी जपत एखाद्या अनोख्या उपक्रमाने संपन्न करत असतात.स्वतःचा वाढदिवस कसा साजरा केला पाहिजे.हे समस्त सातारा जिल्ह्याला ज्यांनी खरंतर तर शिकविले ते म्हणजे सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख होत. काही दिवसांपूर्वी सातारा जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने हारतुरे,गुलाब पुष्पगुच्छ व कोणत्याही प्रकारच्या भेट वस्तू देण्या ऐवजी दिव्यांग बांधवांच्या दृष्टीने आवश्यक असणारे विविध साहित्य भेट देण्यात यावे असे आवाहन करण्यात आले होते.त्यानुसार ३ डिसेंबर रोजी सर्वत्र या आवाहनास प्रतिसाद देत समीर शेख यांचा वाढदिवस हा दिव्यांग बांधवांच्या जीवनात एकप्रकारे मानवतेची फुंकरच मारण्याचे कार्य करण्यात आले. जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून लोणंद ता.खंडाळा येथे लोणंद दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमातून लोणंद पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग बांधवांना व्हील चेअरचे वाटप करण्यात आले.यावेळी लोणंद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले,युवा नेते हर्षवर्धन शेळके, माजी नगरसेवक हणमंतराव शेळके,अध्यक्ष कृष्णा पवार,उपाध्यक्ष संजय बनसोडे, सचिव दीपक शहा,खजिनदार गुलशन भाटिया, सहखजिनदार प्रवीण साळुंखे व सर्व सभासद उपस्थित होते.

दिव्यांगांना आमच्याकडून सहकार्य केलं जाईल असा विश्वास सपोनि सुशिल भोसले यांनी व्यक्त केला. सुशिल भोसले म्हणाले की,तुमच्या काही अडीअडचणी असतील तर तुम्ही आमच्याशी संपर्क



करू शकता.तुम्हाला आमच्याकडून सहकार्य केलं जाईल.तुमच्या अडचणीच्या काळात तुमच्या पर्यंत वेळेत पोलीस पोहोचतील याची खबरदारी घेऊ. जागतिक अपंग दिनी सातारा जिल्ह्याचे पोलीस समीर शेख यांचा देखील वाढदिवस आहे.ते उपक्रमशील असे आहेत.त्यांनी सुरवातीलाच इथे आल्यानंतर गड किल्ले स्वच्छता मोहीम हाती घेतली होती. उंच भरारी ही योजना केली होती.यांमध्ये वंचित व बेरोजगार मुलं आहेत.जी थोडीशी हिकडे तिकडे वळालेली आहेत.अशा मुलांदेखील प्रकाश झोतात आणण्यासाठी व त्यांना काही तरी नोकरी मिळवून गुन्हेगारी गोष्टींपासून दूर करण्यासाठी ही योजना अद्याप पर्यंत चालू आहे.आता पर्यंत हजारा पेक्षा जास्त मुलांना ट्रेनिंग देऊन नोकरीस लावलेलं आहे. त्यानंतर संवाद तक्रारदारांची ही एक योजना लागू केलेली आहे.साताऱ्याला आले तेव्हा पुष्प गुच्छ ऐवजी पुस्तके द्या असे आवाहन समीर शेख यांनी केले होते.मोठया प्रमाणात समीर शेख यांना भेटायला जाणाऱ्या लोकांनी पुस्तके दिली होती.ती सर्व पुस्तके गडचिरोली येथील समाजबांधव आहेत.ज्यांना शैक्षणिक अडचणी आहेत.अशा ठिकाणी पुस्तके वाटप केलेली आहेत. वाढदिवसाच्या अनुषंगाने समीर शेख यांनी चार दिवसांपूर्वी दिव्यांग बांधवांना मदत करण्याचे आवाहन केले होते.भरपूर वस्तू आलेल्या आहेत.त्या वितरित करत आहोत.दोन चेअर ह्या पोलीस अधिक्षक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लोणंद पोलीस स्टेशनच्या वतीने दिल्या जात आहेत. असे सुशिल भोसले यांनी म्हटले.दिव्यांग बांधवांना काम करत असताना कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास आम्हाला संपर्क करत चला,तुमच्या साठी आम्ही सतत धावून येऊ.असे युवा नेते हर्षवर्धन शेळके पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले.



## काटशिवरी फाट्यावर कार्यकर्त्यांकडून फटाक्यांची आतषबाजी आनंदोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** देशातील तीन राज्यात भाजपाला स्पष्ट बहुमत मतदारांनी दिल्याने खुलताबाद तालुक्यातील काटशिवरी फाट्यावर कार्यकर्त्यांकडून फटाक्यांची आतषबाजी व आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

आज दि.०३ मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या तीन राज्याच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी ने स्पष्ट बहुमताने विजय साकार केल्याबद्दल,भारतीय जनता पार्टी रत्नपुर तालुक्याच्या वतीने काटशेवरी फाटा येथे डॉ भागवत कराड साहेब केंद्रीय अर्थराज्यमंत्री,आमदार श्री प्रशांत भाऊ बंब व श्री संजय भाऊ खंबायते जिल्हाध्यक्ष, यांच्या मार्गदर्शनाखाली फटाक्याच्या आतिषबाजीने व मिठाई वाटून विजयी जल्लोश साजरा करण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष श्री ज्ञानेश्वर नलावडे यांनी विजयी जल्लोषा प्रसंगी बोलताना सांगितले की हा विजय नरेंद्र मोदी साहेब यांच्या प्रती विश्वास असलेल्या जनसामान्य व्यक्तीचा व विकसित राष्ट्राचा आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, माजी सभापती गणेश आधाने, शहराध्यक्ष सतिष दांडेकर, माजी उपनराध्यक्ष सुरेश मरकड, नगरसेवक परसराम बारगळ, योगेश बारगळ, शिवाजी गायकवाड, संदीप निकम, राजू ठेंगडे, प्रशांत गदानकर, अंकुश काळे, योगेश काळे, अविनाश वेताळ, सतिष खंडागळे, अंकुश होळकर, सुरेश जाधव, आप्पाराव वाकळे,अविनाश कुलकर्णी, गणेश सावजी, संजय गायकवाड संतोष गायकवाड, अंकुश गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, दत्तू गायकवाड, यांची उपस्थिती होती.

## अवकाळीने लावले अधिकारी-कर्मचाऱ्यांना कामाला; पंचनामे अहवाल कामात व्यस्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी, सुलतानपूर,वेरुळ तिन्हीं मंडळ मधे अवकाळी पावसाने जोरदार हजेरी फटकेबाजी करत खरिप मधील कापूस व रब्बी पिक हंगामातील पिके व हिरवा भाजीपाला चे प्रचंड नुकसान केले तर ठिकठिकाणी नदी नाले तलाव ओढ्यांना पूर पाणी आले व अनेक ठिकाणी रस्ते बांध पुलची अवकाळीने वाट लावून दिल्याने तालुक्यातील प्रशासन अधिकारी व कर्मचारी कामाला लागले आहे. तालुक्यातील तीनही मंडळ दुष्काळ सदृश्य परिस्थिती यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. तर दि.२६ते३०नोव्हेंबर पर्यंत अवकाळीने ढगांची गडगडाट विजेची कडकडाट वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी फटकेबाजी करून तालुकाभर पिकांचे प्रचंड नुकसान केले आहे.खरिप पिकांतील कापसाला लोळून टाकले तर कैऱ्या फुटलेले कापसाच्या वाता करून टाकल्या हाती तोंड आलेला घास निसर्गाने हेरावून घेतले .कापूस बरोबरच नुकताच केलेला पेरा गहु हरभरा तुर जमीन दोस्त केले त्याला पुन्हा नव्याने पेरा करणे आहे.उभा उस जमीनीवर लोळवला तर फळबाग पपाई डाळींब हिरवा भाजीपाला मातीमोल केले.खरिप पिक हंगाम पावसाअभावी तर रब्बी पिक हंगाम अवकाळी पावसामुळे वाया गेले.तालुक्यात दि.२६ते३०नोव्हेंबर सावंगी मंडळ १४०, सुलतानपूर मंडळ ९९व वेरुळ मंडळ ७९ इतकी पर्जन्यमान पाऊस नोंद झाली आहे.अवकाळी तालुकाभर दाणादाण केल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला होता.खरिप गेले आता रब्बी गेले तालुका तथा तालुक्यातील तीन ही महसूल मंडळ दुष्काळ



सदृश्य स्थीती असले तरी जेमतेम शिल्लक पिकें उभे असताना त्याचीही वाट लागल्याने शेतकरी हवालदिल झाला होता.त्यात पिण्याच्या पाण्याची समस्या समोर उभी असताना पाणी टंचाई चा आढावा सुरु झाला व त्याची चर्चा आराखडा घेण्याचे काम प्रशासकीय स्तरांवर सुरुही झाले होते.कारण गिरिजा मध्यम प्रकल्प येसगाव, गंधेश्वर प्रकल्प गंधेश्वर,वगळता,निर्गुडी प्रकल्प तथा दरेगाव सोबलगाव तीसगाव तलावात नाममात्र पाणी साठा शिल्लक आहे.यात अवकाळी पावसाने नदी नाले ओढे तलावाना पुरपाणी आल्याने पाणी साठ्यात वाढ झाल्याचे चित्र आहे.त्यामुळे तात्पुरते पाणी टंचाई लांबणीवर पडली आहे.तर निसर्ग अवकाळी पावसाने तालुक्यात सर्वत्र प्रचंड नुकसान केल्याने अधिकारी कर्मचारी कामा रागले आहे.

यात पंचायत समिती ग्रामपंचायत स्तर ग्रामसेवक ग्रामविकास अधिकारी,तालुका कृषि विभागांचे कृषि सहाय्यक, तहसील कार्यालय तलाठी मंडळधिकारी, तहसीलदार तालुकाकृषिधिकारी सद्या तालुकाभर ग्रामीणस्तर शेती बांधावर पाहणी पंचनामे अहवाल कामांत व्यस्त आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिति अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर